आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १० मार्च २०२३




आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सह महिन्यांपूर्वी राज्यात शिंदे-फडणवीस सरकारची स्थापना झाली. सत्तेत आल्यानंतर अनेक मोठे निर्णय सरकारकडून घेण्यात आले. या काळात राज्यातील एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस सरकारने गुरुवारी आपला पहिला अर्थसंकल्प सादर केला. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अर्थसंकल्पीय भाषण केले. अर्थसंकल्पात अनेक योजनांचा सामावेश करण्यात आला आहे. यापैकी एक म्हणजे महापुरुषांच्या स्मारकांसाठी निधीची घोषणा करण्यात आली आहे. अमृतकाळातील पहिला अर्थसंकल्प 'पंचामृत' ध्येयावर आधारीत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना निधी, पीकविमा, वीज, सोयी, सुविधा याबाबत मोठ्या घोषणा करण्यात आलेल्या आहेत.

# बहुगुणी अर्थसंकल्प



**सन्मान आपल्या युगपुरुषाचा, ठेवू या आदर्श शिवरायांचा!**

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाचे हे 350 वे वर्ष. या महोत्सवासाठी 350 कोटी
- आंबेगाव (पुणे) येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान : 50 कोटी
- मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथे शिवचरित्रावरील उद्याने : 250 कोटी
- शिवनेरी किल्ल्यावर शिवछत्रपतींच्या जीवनचरित्रावर संग्रहालय शिवकालिन किल्ल्यांचे संवर्धन : 300 कोटी

**नमो शेतकरी महासन्मान निधी योजना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता 12,000 रुपयांचा सन्माननिधी**

- प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य सरकारची भर
- नमो शेतकरी महासन्मान निधी योजना
- प्रतिशेतकरी, प्रतिवर्ष 6000 रुपये राज्य सरकार देणार
- केंद्राचे 6000 आणि राज्याचे 6000 असे 12,000 रुपये प्रतिवर्ष मिळणार
- 1.15 कोटी शेतकरी कुटुंबांना लाभ
- 6900 कोटी रुपयांचा भार राज्य सरकार उचलणार

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता केवळ 1 रुपयांत पीकविमा

- आधीच्या योजनेत विमाहप्त्याच्या 2 टक्के रक्कम शेतकऱ्यांकडून
- शेतकऱ्यांवर कोणताच भार नाही. राज्य सरकार भरणार हप्ता
- शेतकऱ्यांना केवळ 1 रुपयांत पीकविमा
- 3312 कोटी रुपये भार राज्य सरकार उचलणार

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी महाकृषिविकास अभियान

- राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी महाकृषिविकास अभियान राबविणार



## महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सूट

यावेळी बोलताना उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांना एसटी प्रवासात ५० टक्क्यांची सूट देण्याची घोषणा केली. तसेच महिला सुरक्षा, सुविधाजनक प्रवासासाठी महिला केंद्रीत पर्यटन धोरण लागू करणार असल्याचेही ते म्हणाले. पुढे बोलताना "कालच, महिला दिन साजरा करण्यात आला. देशीच प्रगती ही महिला सक्षमीकरणाच्या आधारे ठरवली जाते. त्यासाठी आम्ही चौथे सर्वसमावेशक महिला धोरण घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे", अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. तसेच मुलींच्या सक्षमीकरणाकरता 'लेक लाडकी' ही नवी योजना सुरू करण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

## महिलांसाठी 'शक्तीसदन' ही नवीन योजना


शहरी भागात नोकरीसाठी आलेल्या महिलांसाठी केंद्राच्या मदतीने ५० वसतीगृहांची निर्मिती करण्यात येईल. तसेच लैंगिक शोषणापासून मुक्त केलेल्या महिलांसाठी, कौटुंबिक समस्याग्रस्त महिलांसाठी 'स्वाधार' आणि 'उज्वला' या दोन योजनांचे एकत्रिकरण करुन केंद्राच्या मदतीने 'शक्तीसदन' ही नवीन योजना सुरू करण्यात येईल. या योजनेत पीडित महिलांना आश्रय, विधी सेवा, आरोग्यसेवा, समुपदेशन आदी सेवा पुरवण्यात येईल, अशी घोषणी देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## अंगणवाडी सेविकांबाबतही महत्त्वाची घोषणा

अंगणवाडी सेविकांबाबतही फडणवीस यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या. अंगणवाडी सेविकांचे मानधन ८३२५ वरुन १० हजार रुपये करण्यात येईल. तसेच मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन ५९७५ वरुन ७२०० रुपये करण्यात येईल, अशी घोषणी देवेंद्र फडणवीस यांनी केली. याबरोबरच अंगणवाडी मदतनिसांचे मानधन ४४३५ वरुन ५५०० रुपये करण्यात येईल आणि अंगणवाडी, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीसांची २० हजार पदे भरणार, अशी माहितीही त्यांनी दिली.



अर्थसंकल्पानंतर शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी या अर्थसंकल्पाचे 'गाजर हलवा' असे वर्णन करत टीका केली आहे. यापूर्वीचे दोन ते तीन अर्थसंकल्प महाविकास आघाडीच्या सरकारने मांडले होते. करोनाचे संकट होते आणि केंद्र सरकार आमच्या बाजूचे नव्हते. प्रत्येकवेळी २५ हजार कोटींची जीएसटी थकबाकी असायची. आता सहा महिने झाले, महाशक्तीचा पाठिंबा असलेले सरकार आले आहे.




राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे केवळ शब्दांचे फुलोरे, स्वप्नांचे इमले आणि घोषणांचा सुकाळ आहे. राज्याची आर्थिक स्थिती पाहता यातील किती गोष्टींची फलश्रुती होईल याबाबत शंकाच आहे. देवेंद्रजींच्या रुपाने एक अभ्यासू अर्थमंत्री मिळाला असे वाटले होते मात्र अर्थसंकल्प कसा लिहावा? हे पुस्तक लिहिणे आणि खराखुरा अर्थसंकल्प लिहिणे यात खूप फरक आहे. अर्थसंकल्प कसा लिहावा यात अर्थमंत्री कमी पडले, अशी जोरदार टिका करत राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे दूरदृष्टीचा अभाव आणि वास्तवाचे भान नसणारा अर्थसंकल्प असल्याचा हल्लाबोलही विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केला.



अर्थमंत्री फडणवीस यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा आकड्यांचा खेळ असून प्रत्यक्षात काहीही नाही केवळ मोठं मोठ्या आकड्यांची घोषणा आहे. शेतमालाच्या हमीभावाबद्दल अर्थसंकल्पात काहीच नाही, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीबद्दल काहीच घोषणा केलेली नाही तसेच जुन्या पेन्शनबद्दलही अर्थसंकल्पात कोणतेही सुतोवाच केलेले नाही. हा अर्थसंकल्प अर्थहिन व दिशाभूल करणारा असून अर्थसंकल्पात केवळ घोषणांचा पाऊस आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.



सर्वांगीण विकासाचा भक्कम पाया असलेला आणि राज्याला अधिक समृद्ध करणारा राज्याचा सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर केला. हा सामान्य जनतेसाठीचा 'महाअर्थसंकल्प' आणि 'जनसंकल्प' असल्याची प्रतिक्रिया उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली. या अर्थसंकल्पात बार्टी, सारथी, महाज्योती, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यासाठी भरीव निधीची तरतुद करण्यात आली आहे. तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानवविकास संस्थेचे विभागीय कार्यालय नाशिक येथे उभारण्यात येणार आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापे, हिला बैसवू वैभवाच्या शिरी. ही नैतिक जबाबदारी आज तुमच्या आमच्यावर आहे. कारण आम्ही तिचे वारस आहोत. संस्कृत भाषेतून उगम पावलेली, प्राकृतापासून विकसित झालेली ही मराठी. सातवाहन राजांच्या काळापासून वापरात आली, यादव राजांच्या काळात ती भरभराटीस आली. अनेक संत, कवी, लेखकांनी तिला सुंदर लेणे चढवले. त्यातून ती अधिकच श्रीमंत, ऐश्वर्यसंपन्न होत गेली. विवेकसिंधू हा मराठी भाषेतील आद्य ग्रंथ मुकुंदराज यांनी लिहिला. म्हणून ते आद्य कवी. त्यानंतर ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील ज्ञान भांडार मराठीत आणून सर्वसामान्यांसाठी खुले केले. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ आदी ग्रंथ लिहून मराठी भाषेला इतके सामर्थ्य प्राप्त करून दिले की खरोखरच ती ' अमृतातेही पैजा ' जिंकेल. आणि खरोखरीच इतकी सुंदर भाषा त्यांनी वापरली की ओवी असावी तर ज्ञानेशाची असे म्हटले जाऊ लागले. अखिल विश्वासाठी इतके सुंदर पसायदान ज्ञानेश्वर माउलींनी मराठीत मागितले की ते मराठीचे एक अभिमानाचे अक्षर आणि अमर लेणे झाले. पुढे संत एकनाथ, समर्थ रामदास, संत तुकाराम, संत नामदेव आदी संतानी नानाविध ग्रंथ लिहून मराठीला आणखी समृद्ध केले. शिवरायांच्या नेतृत्वाखाली ' मराठी पाऊल पुढे पडले.' आणि मायमराठीला राजाश्रय लाभला, लोकाश्रय लाभला. मराठी भाषेला मराठी मातीचा गंध लाभला. अंगावर रोमांच उभे करणारे शूरवीरांचे पोवाडे लिहिले गेले, लावण्या लिहिल्या गेल्या. संत कवी, पंत कवी यांनी मराठीला समृद्ध केले. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळक, स्वा सावरकर, आगरकर, म. फुले, न्या. रानडे, लोकहितवादी, साने गुरुजी, विनोबा भावे आदींच्या साहित्याने मराठी भाषेला अधिक श्रीमंत केले. खान्देशच्या मातीत जन्मलेल्या बहिणाबाई, बालकवी आदींच्या कवितांनी तर रसिकांच्या मनावर कायमचे गारुड केले.



## आनंदी पहाट

### कलातत्व समजून घ्यावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आधुनिक भारतावर पाश्चिमात्य वैज्ञानिक संस्कृतीचा प्रभाव पडलेला असल्याचं स्पष्ट होत असलं, तरीही ह्या सर्वांचं भान ठेवून भारतीय कलेचा सातत्यानं, साकल्यानं, प्राधान्यानं आपल्याला विचार करावा लागण्याची जाणीव होणं जरुरीचं आहे. शिवाय कलाविष्कारात 'आशय' म्हणून समाविष्ट असलेले 'सांस्कृतिक सारतत्व' आणि मूळ 'कलातत्त्व' ह्या दोन भिन्न बाबी असतात; ह्याचं भानही जागतं ठेवावं लागेल. आंतराष्ट्रीय पातळीवर इतर देश, संस्कृती यांच्या कलेहून भिन्न अशी कोणती गुणवैशिष्ट्ये भारतीय कलेमध्ये आहेत; कलेतील भारतीयता म्हणजे काय ? हे नवीन पिढीला त्यांच्यातील उणिवा दूर करण्यासाठी समजावून देण्याची गरज आहे. प्रत्येक कलेतील प्राणभूत अशा आकृतिप्रधान सौंदर्यतत्वाचं भान ठेवून आशय माध्यमाकृती सौंदर्य कसं शोधायचं ह्याची जाणीव त्यांना करून देणं आवश्यक आहे. विशेषतः भारतीय संस्कृतीचे असे कोणते गुणविशेष भारतीय कलेमध्ये अनन्य सौंदर्याकृतीत उतरताना आढळतात हे समजून घेणेही जरुरीचं आहे. इ. स. पूर्व तिसऱ्या सहस्रकातील मोहें-जो-दडो, हडप्पा ह्या सिंधू संस्कृतीच्या कलेपासून भारतीय दृश्य कलांची सुरुवात होत असल्याची इतिहासात नोंद आहे. परंतू भारतीय विशेष कलाशैलींची सुरुवात इ. स. पूर्व तिसऱ्या शतकातील मौर्य काळापासून होत असल्याचे देखील दाखले सापडतात. बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी ही कला निर्माण झाल्याचं म्हंटलं जातं. भारतीय संगीताचे मूळसुद्धा सामवेदिक संगीतात आहे, असं मानलं जातं. अनादी काळापासून महत्व प्राप्त झालेल्या कलेचा इतिहास खूपच मोठा आणि अनाकलनीय आहे. त्यामुळेच अनंत काळापर्यंत कलाकृतींचं महत्व अबाधित राहिलं आहे. त्या कलांचा वारसा पुढे चालवण्याचं आपलं कर्तव्य असल्याची सतत आपल्याला जाणीव होत राहिली पाहिजे. नवीन पिढीच्या उणिवा दूर करण्यासाठी ह्या कलांचाच वापर करून त्यांना नेणीवेपर्यंत घेऊन जाणं शक्य होऊ शकेल.



आधुनिक केसरी

**जागवी स्वधर्मा | अद्वैतात ||**

भूकेल्याच्या पोटी | भरवी जो घास ||
सात्त्विक तो दास | ईश्वराचा ||१||
प्रारब्धे भोगतो | ब्रह्मानंद नित्य ||
ज्याची वाणी सत्य | वागण्यात (आचरणी) ||२||
सत्कर्माचे ठायी | असे निष्ठावंत ||
हरि कृपावंत | त्याच्या संगे ||३||
माझे मी पणही | गळूनी पडावे ||
चरण धरावे | विठ्ठलाचे ||४|
ज्ञानराज सांगे | भक्तीचा महिमा ||
जागवी स्वधर्मा | अद्वैतात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

दुःखादपि सुखे मातस्
स्मरणमधिकं भवेत्।
कृपाफलं हि ते मत्वा
भोज्यं मया सुखं सदा॥3॥

हे माते, दुःखापेक्षाही सुखात (तुझे) स्मरण अधिक व्हावे. मी सदैव तुझे कृपाफल मानून सुख आस्वादावे.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**जग परिवर्तनशील है, माया कारज सोय ।
क्षण वियोग क्षण योग है, जन्म मरण दुख होय ।।०६ ।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/०६ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मायेने बनलेले हे जड जगत परिवर्तनशील आहे. याचा क्षणात योग-वियोग होतो आणि जन्म-मृत्यूचं दुःख प्राप्त होतं. प्रकृतीतील प्रत्येक पदार्थ तीन गुणांच्या संबंधाने बनलेला आहे, ते एक रुपात राहू शकत नाही, म्हणून पदार्थांचा योग-वियोग होत असतो आणि मायेच्या संबंधाने जीवाला जन्म-मृत्यूचं दुःख प्राप्त होतं.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ग्रंथांच्या वाचनाने आपले संपूर्ण ध्यान किंवा मन भगवंतावर स्थिर झाली पाहिजे. नाही तर ज्ञानेश्वरी, दासबोधाचे वाचन चालु आहे आणि मनात वेगवेगळ्या विषयांची दाटी झाली आहे असे होता कामा नये. ग्रंथ वाचत असताना बुध्दीभेद होऊ नये. म्हणजेच मनाची स्थिरावस्था असावी. ग्रंथ असे वाचावेत की ज्यायोगे मनातील संशय नाहिंसे होतील. शंकांचं निरसन होईल. परमार्थात मोक्षाची तळमळ असते,साधासुधा, सोपा मार्ग सांगितला जातो त्यामुळे परमार्थात अद्वैत ग्रंथ वाचावेत.मन संपूर्ण पणे अध्यात्मिक बाबीऔवर केंद्रित असावे असेच ग्रंथ वाचावेत. आपण आपली स्वतः ची प्रगती करायची असेल तर संत सहवासात रहावे,संताच्या विचारांना आदर्श मानावे त्याप्रमाणे आपले जीवन परमार्थात समर्पित करावे.

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

तीं च भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥२॥
तुका म्हणे देवा । त्यांची केल्या पावे सेवा ॥३॥
आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥१॥
करी इंद्रियांची सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥ध्रु.॥
भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥२॥
तुका म्हणे विषें । अन्न नाशियलें जैसें ॥३॥
ढेकरें जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥१॥
हे ही बोल ते ही बोल । कोरडे फोल रुचीविण ॥ध्रु.॥
गव्हांचिया होती परी । फके वरी खाऊं नये ॥२॥
तुकां म्हणे असे हातींचें कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ॥३॥
करावी ते पूजा मनें चि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥१॥
कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ॥ध्रु.॥
अतिशया अंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजा ऐसें ॥२॥
तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार पावी ॥३॥
एकादशीव्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होइल नेणों

## कोणत्याही परिस्थितीत नामस्मरण शक्य आहे ?

आधुनिक केसरी

मनुष्याची सर्व धडपड शाश्वत समाधान मिळविण्यासाठी चालू असते. ते समाधान फक्त भगवंताजवळ असल्याने समाधानासाठी प्रत्येक माणसाला भगवंताची गरज आहे. आपल्या सर्व धडपडीतून भगवंताच्या प्राप्तीचे समाधान आपल्याला मिळत नाही; आणि त्याला परिस्थिती कारणीभूत आहे, असे सर्वजण सांगतात. पण खरोखरच परिस्थिती आड येते किंवा काय हे आपण बघितले पाहिजे. परिस्थितीसंबंधी विचार करताना एक बाह्य परिस्थिती आणि दुसरी आंतर-स्थिती यांचा विचार करावा लागेल. बाह्य परिस्थितीचा विचार करताना प्रथम आपली शरीरप्रकृती आड येते. ही प्रकृती कशीही असली तरी भगवंताचे स्मरण आपल्याला करता येईल की नाही ? प्रकृतीला कितीही क्षीणत्व आले, देहाला कितीही विकलता आली, तरी अंतकाळी भगवंताचे स्मरण करता येते, असे भगवंताने गीतेत सांगितले आहे. देहाची अवस्था कोणतीही असली, तरी त्यामध्ये नामस्मरण करता येत नाही हे म्हणणे काही



बरोबर नाही. तेव्हा, प्रकृती आड येते, असे म्हणणे कितपत सयुक्तिक ठरेल ? पुष्कळ लोक आर्थिक अडचणींसंबंधी कुरकुर करतात. पैसा नसल्याकारणाने प्रपंचात काळजी उत्पन्न होऊन, भगवंताकडे लक्ष द्यायला सवडच मिळत नाही असे बरेचजण सांगतात. पण खरोखर तुम्ही मला सांगा, जगात भरपूर धन मिळवून वैभवाच्या शिखरावर पोहोचलेले कितीसे लोक नामस्मरण करतात ? आजपर्यन्त किती राजे लोक आपले राजवैभव लाथाडून भगवंताच्या प्राप्तीसाठी बैरागी झाले ? आपल्याजवळ पैसा नसणे हे भगवंताच्या प्राप्तीच्या आड येते, हे म्हणणे बरोबर नाही. उलट, पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो. पैसा असला की आपल्याला एक आधार आहे असे वाटते. म्हातारपणी आपल्याला उपयोगी पडावा म्हणून पैसा साठवायचा प्रयत्न करावा, तर मी म्हातारपणापर्यंत जगेन याची खात्री कोणी द्यावी ? सुख, समाधान, हे पैशावर अवलंबून नाही. प्रत्येकाची गोतावळी ठरलेली आहे. वेताळाची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर पिशाच्चे निघायचीच; आणि भगवंताची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर दया, क्षमा, आणि जिकडेतिकडे आनंदी वृत्ती, ही असायचीच. त्याचप्रमाणे पैसा आला की त्याच्याबरोबर तळमळ, लोभ, असमाधान, ही यायचीच. परस्त्री एखादे वेळी विषयभोगामध्ये आपल्याला सामील होणार नाही, पण पैसा मात्र आपण वापरू तसा वापरला जातो. बाप-मुलगा, भाऊ-भाऊ, भाऊ-बहीण, मित्र-मित्र, यांच्यामध्ये वितुष्ट आणायला कारण काही असेल तर पैसाच होय.

**आपण पैसा साठविला तर गैर नाही , पण त्याचा आधार न वाटावा. अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये.**

शुक्रवार, १० मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१९२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 10 MARCH 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-192 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5







# उत्तर प्रदेशातील लस्सी, आईस्क्रीम, ज्यूस विक्रेत्यांनी मराठी माणसांना लावले वेड !

## देशी लस्सीमुळे घातक केमीकलयुक्त कोल्डड्रिंकचा नागरिकांना विसर

आधुनिक केसरी न्यूज

**चौधरी दिनेश**

**पुर्णा :** उन्हाळ्याच्या दिवसांना सुरुवात झाली की उत्तर प्रदेशातील लस्सी/आईस्क्रीम/जुस विक्रेत्यांची पाऊल जशी महाराष्ट्राच्या दिशेने वळू लागतात त्याच प्रमाणे फेब्रुवारी/मार्च महिण्यात कडक उन्हाळा लागताच शितपेयांच्या शोधात निघणाऱ्या लोकांची पाऊल देखील आपोआपच लस्सी/आईस्क्रीम/ज्युस सेंटरकडे वळायला सुरुवात होते शेकडो किलोमीटरचे अंतरपार करुन महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातल्या प्रत्येक शहरात परराज्यातून उत्तर प्रदेश/राजस्थान मधून महाराष्ट्रात रोजीरोटीच्या शोधात आलेले युपीतील भैया अन् राजस्थानातील महाराज आपआपली दही/दुधापासून बनवलेली चवदार शितपेयांची दुकान/हातगाडे जागोजाग थाटतात... या शितपेयांमध्ये मानवी आरोग्यास उपायकारक दुध/दही आदीपासून बनवलेली लस्सी/फळांचे ज्युस/आईस्क्रीम/कुल्फी/कसाटा/बादामसेक आदींचा समावेश असतो.

उत्तर प्रदेशातील फरुखाबाद, कन्होज, कानपूर जिल्ह्यातून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील शहरांसह गावपातळीवर आपआपली देशी बनावटीच्या शितपेयांची दुकान थाटलेल्या या उत्तर प्रदेशातील भैयांच्या स्वाभावातील प्रेमळपणा स्थानिक लोकांमधौये आआपुलकी निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो. आलेल्या प्रत्येक ग्राहकाला अत्यंत आदराने बोलून त्यांचे समाधान कसे करावे या त्यांच्या सद्गुनांचा प्रत्येक व्यक्तीने अंगीकार केल्यास निश्चितच एकमेकांच्या मनात एकमेकां विषयी असलेला द्वेष/मच्छर आपोआपच संपुष्टात येईल असे म्हणण्यास हरकत नाही. महाराष्ट्रातील जनतेला स्वदेशी दही/दुधापासून बनवलेल्या देशी बनावटीच्या शितपेयांची सवय जर कोणी लावली असेल तार या उत्तर प्रदेशातील भैयांनीच असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. विदेशी बॉटलबंद शितपेय (कोल्ड ड्रिक) यात थंम्सअप, स्प्राईट, कोको-कोला, स्टिंग, फंन्टा, मिरींडा, माझा, सेवनअप, लिमका, माऊंटेन ड्यू या केमीकल/रसायनयुक्त शितपेयांमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो हे आरोग्यतज्ञांनी वेळोवेळी सिध्द काले आहे या शितपेयांचे सातत्याने सेवन केल्यामुळे मनुष्याचे वजन झपाट्याने वाढण्यास सुरुवात होते कारण यात साखरेचे देखील प्रमाण जास्त असते साखरेच्या सेवनामुळे वजन वाढण्यापासून आरोग्याशी संबंधित अनेक समस्या उद्भवतात एक ग्लास कोल्ड्रिंकमध्ये अंदाजे आठ ते दहा चमचे साखर असते. त्याचप्रमाणे कोल्ड्रिंक्स पिऊन तुम्ही तुमच्या आहारात साखर घालता, जी आमच्या आरोग्यासाठी कोणत्याही प्रकारे चांगली नसते एक ग्लास कोल्ड ड्रिंकमध्ये सुमारे १५० कॅलरीज असतात. दररोज इतक्या कॅलरीजचे सेवन केल्याने तुमचे वजन वाढते आणि आरोग्याशी संबंधित समस्याही मोठ्या प्रमाणात निर्माण होतात त्यामुळे बॉटलबंद शितपेयांचे सेवन करणे होईन तोपर्यंत टाळलेलेच बरे.







**दही/दुधापासून बनलेल्या शितपेयांमुळे पोटाचे आरोग्य चांगले राहते :** बीबॉडीवाइजमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, काही लोक उन्हाळ्यात तहान शमवण्यासाठी कार्बोनेटेड पेये, कोल्ड ड्रिंक्स, शर्करायुक्त सोडा इत्यादी पितात, ज्यामुळे आरोग्याला अनेक प्रकारे हानी पोहोचते .त्यामुळे पोटदुखी, स्मृतिभ्रंश, पोटाची चरबी, यकृतातील चरबी, मेटाबॉलिक सिंड्रोम इत्यादी समस्या वाढवतात नैसर्गिक पेय किंवा सेंद्रिय पेय म्हणून लस्सी पिणे चांगले . सोडा आणि साखरयुक्त पेयांपेक्षा लस्सी हा आरोग्यदायी पर्याय आहे . लस्सी गोड असते, जी दह्यापासून तयार केली जाते . लस्सीमध्ये विविध प्रकारचे पोषक आणि चांगले बॅक्टेरिया असतात, पोटाचे खराब आरोग्य बरे करून एकूण आतड्याचे आरोग्य सुधारते .

# बारावी पेपरफुटी प्रकरणी मुंबईच्या पोलीसांची रुईछत्तीशीत कारवाई

## फोडलेल्या या प्रश्नपत्रिकेची प्रत्येकी १० हजारांना विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** बारावीच्या पेपरफुटी प्रकरणाचा तपास करणाऱ्या मुंबईच्या पोलीस पथकाने काल रात्री अहमदनगर जिल्ह्यात रुईछत्तीशी या गावात मोठी कारवाई केली आहे. तेथून एका मुख्याध्यापकासह ५ जणांना पोलिसांनी अटक केली. प्रश्नपत्रिकेचा फोटो काढून ते व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून पाठवून प्रत्येकी १० हजार रूपयांना विक्री केल्याचा त्यांच्यावर संशय आहे. तीच प्रश्नपत्रिका दादर येथील परीक्षा केंद्रावर पकडण्यात आल्याने हा प्रकार उजेडात आला. मुंबईच्या या पथकाने त्यांच्याकडे दाखल गुन्ह्यात तपास करताना अहमदनगर जिल्ह्यातील धागेदोरे हाती लागले. त्यानुसार पथक नगर तालुक्यातील रूईछत्तीशी गावात आले. तेथून किरण दिघे, अर्चना भामरे, भाऊसाहेब अमृते, वैभव तरटे, सचिन महारनवयांना ताब्यात घेऊन मुंबईला नेण्यात आले. मुख्याधापकासह दोन शिक्षक, एक चालक आणि शाळा मालकाच्या मुलीला अटक करण्यात आली आहे. १२ वीची प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी मुंबईत दादर येथील अँटॉनिओ डिसिल्वा हायस्कूलमधील शिक्षिकेने शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिथे हा गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचा तपास करताना पोलिसांना याचे धागेदोरे अहमदनगरच्या रूईछत्तीशी गावातही असल्याचे आढळून आले. इथे परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका आल्यानंतर त्याचे फोटो काढून व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले. फोडलेल्या या प्रश्नपत्रिकेची प्रत्येकी १० हजार रुपयांना विक्री करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# अभिनेते सतीश कौशिक यांचे हृदयविकाराने निधन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चित्रपट दिग्दर्शक आणि अभिनेते सतीश कौशिक यांचे निधन झाले आहे. ते ६६ वर्षांचे होते. दिल्लीत असताना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे निधन झाले. सतीश कौशिक यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांनी इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सतीश कौशिक यांच्या निधनाची माहिती दिली.



सतीश चंद्र कौशिक यांचा जन्म १३ एप्रिल १९५६ रोजी हरियाणामध्ये झाला. ते प्रसिद्ध अभिनेते आणि चित्रपट दिग्दर्शक होते. चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यापूर्वी त्यांनी अनेक नाटकांमध्येही काम केले. सतीश कौशिक यांनी मिस्टर इंडिया, दीवाना मस्ताना, साजन चले ससुरालसह अनेक हिंदी चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका केल्या आहेत. तसेच त्यांनी रूप की रानी चोरों का राजा, प्रेम, हम आपके दिल में रहते है आणि तेरे नाम यासारख्या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. १९८३ मध्ये 'जाने भी दो यारो' या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले होते.

## पाक, चीनचा भारताला धोका

आधुनिक केसरी

गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तान आणि चीन या दोन शेजारी देशांबरोबर भारताचे असणारे संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. दोन्ही देशांकडून सातत्याने सीमाभागात भारताला मनस्ताप देणाऱ्या कारवाया केल्या जात असताना भारताकडूनही याबाबत ठाम आणि निषेधाची भूमिका घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आशियामध्ये शांतता प्रस्थापित होण्यासाठी पाकिस्तान आणि चीनकडून सीमाभागात होणाऱ्या कारवाया थांबवण्याची आवश्यकता आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यक्त केली जात आहे. यावर आता थेट अमेरिकेच्या गुप्तचर खात्याकडून इशारा देण्यात आला आहे. बुधवारी अमेरिकेतील गुप्तचर खात्याकडून पाकिस्तान आणि चीनबाबत गंभीर इशारा देण्यात आला आहे. यानुसार आगामी काळात पाकिस्तान आणि चीनकडून भारताला धोका निर्माण होण्याची शक्यता असून त्या पार्श्वभूमीवर भारताकडून त्याचा आक्रमकपणे प्रतिकार केला जाऊ शकतो. अमेरिकी गुप्तचर विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार, आशियामध्ये भारत, पाकिस्तान आणि चीन या देशांमधील संबंध तणावपूर्ण असून त्यांच्यात संघर्ष होण्याची शक्यता आहे. पाकिस्तान आणि चीनकडून उचलण्यात येणाऱ्या पावलांवर भारताकडून आक्रमक भूमिका घेतली जाण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताकडून चीन आणि पाकिस्तानला लष्करी कारवाईच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिली जाण्यची शक्यताही अमेरिकी गुप्तचर विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, भारताच्या चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांसह शांतता प्रस्थापित करण्यासाठी द्विपक्षीय चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आहेत. २०२०मध्ये गलवान प्रांतात चीनकडून करण्यात आलेल्या आगळिकीनंतर या फेऱ्या वाढल्या आहेत. शिवाय, पाकिस्तानशीही पूर्वापार चालत आलेल्या शत्रुत्वावरही दोन्ही बाजूंनी चर्चेच्या माध्यमातून उत्तर काढण्याचा प्रयत्न चालू असताना पुन्हा संघर्षाची ठिणगी पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सर्वश्रेष्ठ क्रांतिकारक- सावित्रीमाई फुले

आधुनिक केसरी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

**समाज सुधारक आणि क्रांतिकारक यांच्या मध्ये खुप मोठा फरक आहे. तो फरक म्हणजे समाजसुधारक आहे ती परिस्थिती मान्य करून त्यामध्ये काही बदल करणे आवश्यक आहे असे सांगतात तर क्रांतिकारक हे अस्तित्वात असलेली व्यवस्था झुगारून नवीन व्यवस्था तयार करतात. म्हणून आधुनिक भारताच्या थोर क्रांतिकारक म्हणून सावित्रीमाई शिवाय इतिहास पुर्णच होऊ शकत नाही. गोट्याला शेंदूर। फासुनी तेलात वसती देवात। दगड तो... अखिल मानवजातीला शिक्षणाच्या प्रवाहात आणुन त्यांचा सर्वांगीन विकास करण्यासाठी लोकांनी शेण माती आणि खरकडे पाणी फेकले ते सुद्धां सावित्रीमाई ने समाजासाठी समजाच्या भल्यासाठी अंगावर घेतले परंतु स्त्रि शिक्षण बंद केले नाही.**

एक विचार केला तर गजगंड श्रीमंत असलेल्या सावित्रीमाईला वैयक्तीक कोणत्याही प्रकारची अडचण नव्हती. तरीही हाल अपेष्टा आणि अवमान सहन केला तो समाजातील अंधकार दूर होऊन समजात ज्ञानाचा व विज्ञानाचा प्रकाश पडण्यासाठी. आज महिला शिकल्या नोकरी वर लागल्या पैसा अडका खुप मिळतो परंतु एकदाही सावित्रीमाईची आठवण येत नाही किंवा सावित्रीमाई बाबत माहीतच नाही असा बहुसंख्य वर्ग आहे. आणि काही महिलांना सावित्रीमाई नाव माहिती आहे परंतु कार्य नाही. वरील ओळी वाचल्या तर आपल्या लक्षात येते समाजात अज्ञान आणि अंधश्रद्धा आहेत आणि त्याचे मुख्य कारण आहे ते लोकांच्या मनावर लादलेले देव. जो पर्यंत लोक सत्य परिस्थिती लोक समजून घेणार नाही तो पर्यंत परिवर्तन होणार नाही म्हणून सत्य परिस्थिती सांगण्याचा सावित्रीमाई यांचा नेहमी प्रयत्न होता. अंधश्रद्धा अज्ञान आणि विषमेतवर त्यांनी प्रहार करून सामाजिक प्रबोधन केले.

**धोंडे मुले देती। नवसा पावती**
**लग्न का करीती। नारीनर**

नवस केल्याने मुळ बाळ होत नाही. म्हणजे नवस हे थोतांड आहे. जर नवस केल्याने मुल झाली असती तर नारी आणि नर यांना लग्न करण्याची गरजच नसती. नवस, देव जोपर्यंत समाजामधून जाणार नाही तोपर्यंत समाजामधली अंधश्रद्धा व अज्ञान कायम राहील असे सावित्रीमाई फुले यांना वाटत होते म्हणून शिक्षणावर भर देऊन शिक्षणाद्वारेच आपण अंधश्रद्धा व अज्ञान दुर करू शकतो. अशी खात्री सावित्रीमाई यांना होती. परंतु सावित्रीमाई मुळे शिकलेल्या महिलांनी सावित्रीमाई कधी वाचल्याच नाही. म्हणून आज स्वतः ला सुशिक्षित आणि समजदार समजणाऱ्या महिला अज्ञान व अंधश्रद्धेमध्ये गूरफटून पडल्या आहेत. माणसाचे मागास राहण्याचे काय कारण आहे हे दोनच ओळीत सावित्रीमाई फुले सांगतात...

**शुद्र अतिशुद्र। अज्ञानाने पछाडले**
**देव धर्म रुढी अर्ची। दारीद्र्याने गळाले**

आणि म्हणून आपला समाज मागास राहीला होता व आजही शिक्षीत समाज असला तरी बहुसंख्य लोक वैचारिक दृष्टीने मागास आहेत. आणि वैचारिक मागास लोक आजही मानसिक गुलाम आहेत आणि त्याच गुलामीमध्ये त्यांना आनंद आहे. शिक्षणाचा वापर फक्त नोकरी करून पैसा मिळवणे एवढाच झालेला आहे. शिक्षणातुन तर्क, सत्य, संशोधन आणि चिकित्सा होणे आवश्यक असताना ती होत नाही याचे कारण मानसिक गुलामगिरी आणि म्हणून सावित्रीमाई फुले म्हणतात..

**पशुत्वाची लज्जा नाही। त्यालाच मानतो सुखही**
**पशुजिवाची लक्षणे ही। तयास माणव म्हणावे का ?**
**गुलामगिरी चे दुःख नाही। जराही त्यास जाणवत नाही**
**माणुसकी ही समजत नाही। तयास मानव म्हणावे का ?**

आज सुशिक्षित समजणारे लोक सुद्धा सावित्रीमाई च्या वरील ओवीमध्ये बरोबर बसतात म्हणजे सावित्रीमाई चे विचार मानव कल्याणाचे विचार होते याची जाणीव लोकांना कधी होणार ?

**विद्या धन आहे रे।श्रेष्ठ साऱ्या धनाहून**
**तिचा साठा जयापाशी। ज्ञानी मानती तो जन**

विद्या अर्थात शिक्षण हे सर्व श्रेष्ठ धन आहे. त्याचे मोल कोणत्याही किंमती मध्ये होऊ शकत नाही. आणि शिक्षणाचा साठा ज्यांच्या कडे आहे त्याला लोक विद्वान समजतात. परंतु भारतात आजही परिस्थिती उलटी आहे. सुशिक्षित लोक उच्च शिक्षीत, विज्ञानवादी लोकांसमोर नतमस्तक न होता अडाणी पाखंडी लोकांसमोर नतमस्तक होतात. अडाणी पाखंडी लोकांमध्ये दैवशक्ती असते असे त्यांचे मत असते आणि त्या दैवशक्ती साठी अडाणी पाखंडी व वयाने लहान असलेल्या भोंदुसमोर नतमस्तक होऊन आपली विद्वता अडाणी व अज्ञानी लोकांच्या पायथ्याशी गहाण ठेवतात हीच एक शोकांतिका आहे. सावित्रीमाई यांनी शिक्षणाच्या माध्यमातून, अंधश्रद्धा, थोतांड, विषमता यावर प्रहार करून सामाजिक क्रांती केली. शिक्षण फक्त लिहणे वाचणे किंवा चांगले कपडे घालणे म्हणजे शिक्षण नाही तर विचारपरिवर्तन म्हणजे शिक्षण होय. आपल्या ज्ञानाचा फायदा समाजाला होणे म्हणजे शिक्षण होय. सर्व समस्येचे मुळ कारण अज्ञान आहे. अज्ञानामुळे अंधश्रद्धा, पाखंड व विषमता निर्माण झाली हे कोणी केले यावर सावित्रीमाई फुले म्हणतात..



**नांगर जे धरती। शेती करती**
**मठ्ठ ते असती। मनु म्हणे**
**करू नका शेती। सांगे मनुस्मृती**
**धर्माज्ञा करती। ब्राम्हणास**
**शुद्र जन्म घेती। पुर्वीची पाप ती**
**या जन्मी फेडती। शुद्र सारे**
**विषम रचीती। समाजाची रिती**
**धुर्ताची ही निती। अमानवीय**

समाजाची विषमतावादी व्यवस्था निर्माण करून समाजाचे वैचारिक व आर्थिक शोषण मनुस्मृती ने केले. आणि मनुस्मृती च सर्व समस्येचे मुळ आहे याची जाणीव सावित्रीमाई फुले यांना होती आजच्या शिकलेल्या लोकांना याची जाणीव आज झाली ? हा खूप गहन प्रश्न आहे. सावित्रीमाई फुले आपल्याला समजल्या असत्या तर देशातील महिला व देशाने जगावर अधिराज्य केले असते. परंतु तेव्हा शेणमाती फेकून सावित्रीमाईचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला आणि आज सावित्रीबाई मुळे शिकून ही सावित्रीमाई चे विचार न घेता सावित्रीमाई च्या कार्याची जाणीव न ठेवता स्वतः ला सुशिक्षित व वैचारिक समजणारे किती वैचारिक अपंग आहेत याची जाणीव होते. आठ मार्चला महिला दिनानिमित्त अनेक महिलांनी अनेक लेख लिहले अपवाद वगळता महिलांनी आपले स्थान, आपला स्वाभिमान, आपले शिक्षण, कोणामुळे आहे हे सांगण्याची गरजच वाटली नाही. एका शब्दामध्ये सुद्धां सावित्रीमाई चा उल्लेख न करणाऱ्या महिलांनी महिला दिन साजरा केला. आपण व्यक्त होतोय, लिहतोय, बोलतोय महिला दिन उत्सवात साजरा कोणा मुळे करतो हे जाणीवपूर्वक विसरणे म्हणजे सामाजिक व वैचारिक बेईमानी आहे आणि हे चित्र समाजात आजही आहे. परंतु ज्या सावित्रीमाई मुळे महिलांना शिक्षण, संरक्षण आणि धनप्राप्ती च्या माध्यमातून सुख मिळाले त्या सावित्रीमाई ला वाचुन त्यांचे विचार घेऊन महिला वागल्या तर खरचं तीच एक मोठी आदरांजली सावित्रीमाई ला असेल. आज मोठ मोठे घर झालेत घरामध्ये मोठमोठ्या फ्रेम आहेत परंतु त्या फ्रेम मध्ये सावित्रीमाई नाही. आज घरामध्ये मोठ मोठे कपाट आहेत, कपाटात बसणार नाही एवढ्या साड्या व सौंदर्यप्रसाधने आहेत. परंतु दुःख याच आहे त्या कपाटात सावित्रीमाई फुलेचे पुस्तक नाहीत. कोणी पायातला काटा काढला त्याची जाणीव ठेवावी ही संस्कृती असताना ज्यांनी काटा मोडूच नाही म्हणून योग्य वाटा दाखवल्या ते लोक किती थोर असतील याचा थोडासा जरी विचार केला तर आपली वैचारिक परिपक्वता दिसुन येईल. अंधश्रद्धा व अज्ञान पाळून अनेक महिला अनेक रुढी परंपरा एक महिला म्हणून वैयक्तिक पातळीवर देखील पाळतात. परंतु किमान आठवड्यात, महिन्यात एकता तरी सावित्रीमाई ला वंदन करणाऱ्या वंदन करणाऱ्या किती महिला असतील ? सावित्रीमाई यांनी शिक्षण सुरु केले हो उद्देश पुर्ण झाला का ? पुर्ण नसेल झाला तो पुर्ण करण्यासाठी काय करावे लागेल ? महिलांचे त्यासाठी काय योगदान असायला पाहिजे ? यावर कीती महिला विचार विनीमय करत असतील. जागतिक पातळीवरचे कार्य व विचार असलेल्या सावित्रीमाई चे कार्य व विचार आजही घराघरात पोहचले नाही याचे मुख्य कारण देशातील बहुसंख्य लोक हे वैचारिक दृष्टीने कमकुवत आहेत. पाखंड असत्य अज्ञान व अंधश्रद्धा विषयक माहिती लवकर त्यांच्या डोक्यात जाते परंतु विज्ञानवादी व परिवर्तनवादी विचार आजही त्यांना पचत नाही कारण त्यांची वैचारिक पातळी तेवढी परिपक्व झाली नाही. परंतु जर सावित्रीमाई चे विचार व कार्य आज समजून घेतले नाही तर पुन्हा एकदा अंधश्रद्धा व अज्ञानाचा पगडा महिलांच्या डोक्यावर येईल तेव्हा मात्र त्यातून बाहेर येणे खुप अवघड असेल. पाखंड व अंधश्रद्धा पसरवणाऱ्या कार्यक्रमामध्यज महिलांचा सहभाग आजही जास्त आहे परंतु वैचारिक कार्यक्रमात महिलांची उपस्थिती नसते आणि हाच विरोधाभास एक दिवस देशातील लोकांना घातक ठरेल म्हणून आपल्याला कशाची आवश्यकता आहे हे ओळखून आपण काम केले पाहिजे. सत्य ,विज्ञान व तर्क स्विकारुन आपण वैचारिक प्रगल्भता वाढवली तरच शिक्षण व सावित्रीबाई फुले यांनी घेतल्या परिश्रमाचे सार्थक होईल.

स्मृतीदिनी सावित्रीमाई फुले यांच्या विचारास व कार्यास विनम्र अभिवादन!

## आता कशावर, कुणावर विश्वास ठेवायचा ?

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**नुकत्याच दोन सनसनाटी बातम्या आल्यात.विविध शैक्षणिक संस्था,विद्यापीठ यांचे मानांकन करणारी राष्ट्रीय स्तरावरील संस्था न्याक (NAAC). तिचे चेअरमन यांनी राजीनामा दिला.अन् तडकाफडकी त्या जागी नव्या चेअरमनची नियुक्ती झाली देखील! जाणारे अन् येणारे दोघेही महाराष्ट्रातील आहेत हा योगायोग! जे गेलेत त्यांनी वैतागून राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली. तो राजीनामा नव्हता असे ही स्पष्टीकरण प्रसिध्द झाले आहे.यू जी सी ला वैतागून पाठविलेल्या पत्रात त्यांनी जी कारणे दिलीत ती अतिशय गंभीर, चिंताजनक आहेत.त्या(NAAC), संस्थेत, भ्रष्टाचार, अनागोंदी आहे असे म्हंटले आहे.**

ग्रेड देताना सुविधा नसल्या तरी गुण वाढवून दिले जातात असेही म्हंटले आहे.यापूर्वी अनेक शिक्षण संस्था नी असे आरोप केले आहेत. एकाच शहरातील विविध कॉलेजेस ची माहिती एकमेकांना असतेच. ती झाकली मूठ नसते.उघडे गुपित असते! त्यामुळे सामान्य कॉलेजला ए ग्रेड, अन् त्यापेक्षा सरस, सुविधांनी परिपूर्ण, अशा कॉलेजला मात्र बी ग्रेड मिळते, तेव्हा नाराजी स्वाभाविक असते. काही संस्था अशा वेळी अपील करतात, पुन्हा मुल्यांकन करण्याची विनंती करतात.तेव्हा त्याची ग्रेड वाढते कधी कधी! पण यात वेळ, पैसा खर्च होतो त्याचे काय ? अनेक संस्था या राजकारणी पुढारी, मंत्री यांचेशी संबंधित असतात.तेव्हा तोही दबाव असतोच तपासणी करणाऱ्या कमिटीवर. शिवाय तज्ञाची बडदास्त ,महागड्या भेटी ही प्रलोभने असतातच. हे खुले नसते.नियम प्रमाणे नसते. पण चालते.हेच प्रकार प्रोफेशनल संस्थांचे मानांकन करणाऱ्या ए आय सी टी ई या संस्थेत देखील पूर्वी होते.( आताचे माहिती नाही ). यासाठी तेव्हा या संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर कडक कारवाई( म्हणजे अटक,शिक्षा ) झालेली आहे. पण पब्लिक मेमरी अल्पकाळ टिकते असे म्हणतात. त्यामुळे रात गई बात गई या उक्ती प्रमाणे सगळे विसरले जाते.

एकीकडे नवे शैक्षणिक धोरण, गुणवत्ता पूर्ण शिक्षण, आधुनिक संशोधन, जागतिक पातळीवर स्पर्धा, विश्व गुरू, महासत्ता होण्याच्या बाता करायच्या, अन् दुसरीकडे याच गुणवत्ता तपासणाऱ्या संस्थांच्या प्रमुखानीच लक्तरे वेशीवर टांगायची या विरोधा भासाला काय म्हणायचे ?आता कोणते क्षेत्र, कोणती संस्था भ्रष्टाचार मुक्त राहिलीय हेच शोधावे लागेल! सध्या सुरू असलेल्या दहावी बारावी परीक्षेतील गोंधळ, मुक्त कॉपी अभियान आपण बघतोच आहोत रोज!

आपण या संस्था स्वायत्त आहेत असे म्हणतो. पण अगदी सि बी आय, ई डी, आय टी, या संस्थांचे वर्तन, त्यांचा तपास, हे देखील शंकेच्या नजरेनेच बघावे असे सारे काही सुरू आहे. अगदी न्याय संस्थेत देखील लहान कोर्टाचे निकाल, मुख्य न्यायालयाचे निकाल अन् सुप्रीम कोर्टाचे निकाल हे मुळात एकाच कायद्यावर, एकाच संविधानावर आधारित असले तरी एकदम भिन्न, उलटे असतात! हे सामान्य सुशिक्षित माणसाच्या समजुतीच्या पलीकडचे आहे.

याच पार्श्वभूमीवर एक बातमी उच्च शिक्षण विभागाच्या फतव्यावर आधारित आहे.या आदेशा नुसार ज्या शिक्षण संस्थांनी, विद्यापीठांनी अजूनही न्याक चे मानांकन करून घेतले नाही ते मार्च च्या आत करावे असे म्हंटले आहे.ज्या संस्थेकडून हे मानांकन होते तिथे अनागोंदी आहे, काहीच आलवेल नाही असे संस्थेचे प्रमुखच वैतागून म्हणत असतील( अन् याच कारणानी राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त करत असतील ) तर अशा संस्थेच्या मानांकनात अर्थ तरी काय, कशाला ते करायचे उगाच, असा प्रश्न कुणी विचारला तर सरकार काय उत्तर देणार ?शिवाय मार्च ही डेड लाईन देखील हास्यास्पद आहे. नॅक तपासणी न केलेल्या कॉलेजेस ची संख्या इतकी जास्त आहे की इतक्या अल्पावधीत या तपासण्या केवळ अशक्य आहे. त्यामुळे नॅक तपासणी केली नाही तर विद्यार्थ्यांचे प्रवेश होणार नाहीत या धमकीला काही अर्थ उरत नाही.लहान मुलांना वडील पोकळ धमक्या देतात तसाच हा प्रकार ठरतो!

जोपर्यंत अशा सर्व महत्वाच्या संस्था, संपूर्ण पणे स्वायत्त होत नाहीत, यातील नेमणुका पासून तर दैनंदिन कारभारा पर्यंतची सरकारी, राजकीय ढवळा ढवळ पूर्णपणे बंद होत नाही, प्रामाणिक, तज्ञ मंडळी कदे सारा कारभार सोपवला जात नाही, तोपर्यंत पारदर्शी, न्याय्य, सर्वमान्य निर्णयाची अपेक्षा न केलेलीच बरी. स्पष्ट, सडेतोड बोलणारे, न्याय्य टीका करणारे कणखर तज्ञ, प्रशासक नकोच असतात सरकारला.ज्या तत्परतेने नॅक च्या अध्यक्षा चा न दिलेला राजीनामा स्विकारल्या गेला त्यावरून हेच सिध्द होते.एरवी अशी अनेक महत्वाची पदे आहेत जिथे महिनोन महिने नेमणुका होत नाहीत. प्रभारी च गाडे हाकतात, महीनोन महिने, नव्हे वर्षानुवर्षे! पण हीच तत्परता तिथे दिसत नाही.हीच परिस्थिती चालू राहिली तर जागतिक नामांकने जाहीर झाल्यावर किंवा नोबेल पुरस्कार जाहीर झाल्यावर, आपली विद्यापीठ, आपले संशोधक त्या यादीत नाहीत म्हणून नरकाश्रू ढाळण्याची गरज नाही! गुणवत्ता आडातच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार ?

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# तुकाराम बीजेला नाथांच्या वाड्यातील २१ फूट खोल व ९ फुट रुंद रांजण भरण्याची प्राचीन परंपरा

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** नाथषष्टी सोहळ्याच्या निमित्ताने तुकाराम महाराज बीजेला नाथांच्या वाड्यातील रांजण भरण्याची प्राचीन परंपरा आहे. २१ फूट खोल व ९ फूट रुंद संपूर्ण दगडी बांधकाम असलेले हा रांजण आजही सुस्थितीत आहे. तुकाराम महाराज बीज मुहूर्तावर पैठण येथील संत एकनाथ महाराजांच्या वाड्यात कृष्णाने श्रीखंड्याच्या रूपात पाणी भरलेल्या नाथांच्या रांजणाची विधिवत पूजा व आरती, नाथवंशजाच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विठ्ठलबुवा गोसावी, रावसाहेब महाराज गोसावी, सरदार महाराज गोसावी, हरिपंडीत गोसावी, उमाकांतश्रीजेश, शार्दुल हरिपंडीत, पुस्कर गोसावी, ज्ञानराज श्रेयस, तसेच महीलाची उपस्थिती होती. यानंतर नाथवंशज व महिला भाविकांनी गोदावरीतून पाणी आणून रांजण भरण्यास सुरुवात करुन नाथषष्टी उत्सव यात्रा सोहळ्याला औपचारिक प्रारंभ करण्यात आला. यानिमित्त दुपारी नाथांच्या मंदिरात ( वाड्यात ) परंपरेनुसार हा धार्मिक कार्यक्रम भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. नाथषष्टी सोहळ्याच्या निमित्ताने तुकाराम बीजेला नाथांच्या वाड्यातील रांजण भरण्याची प्राचीन परंपरा आहे. त्यामुळे या रांजणाला मोठी धार्मिक परंपरा असून या निमित्ताने भाविकांत चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

> नाथांच्या या वाड्यातील रांजणात श्रीकृष्णाने श्रीखंड्याच्या रुपात येऊन १२ वर्षे पाणी भरल्याची आख्यायिका आहे . त्यामुळे नाथांचा हा रांजण भाविकांचे श्रद्धास्थान आहे .







# महिला दिनानिमित्त पी.एम.एफ.एम.ई. योजनेची तालुकस्तरीय कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुका कृषि अधिकारी सोयगाव एस. जी. वाघ यांच्या अध्यक्षतेखाली आज दि. ०८ मार्च रोजी मौजे पळसखेडा येथील मंगलकार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न पक्रिया उद्योग योजनेच्या तालुकस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. कार्यशाळेत प्रामुख्याने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना याविषयी माहिती देण्यात आली. तालुका कृषि अधिकारी, सोयगांव एस. जी. वाघ व कृषि अधिकारी सोयगांव एम. पी. सैंदाणे यांनी योजनेचे फायदे याबाबत माहिती दिली तसेच ए. एस. महाजन बी. टी. एम. सोयगांव यांनी योजनेत कोणकोणते व्यवयसाय घेतले जाऊ शकतात व अर्ज करण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे तसेच अर्ज कसा करावा याबाबत माहिती व सद्य स्थितीत गावतून किती अर्ज सादर आहेत याबद्दल माहिती दिली. जागतिक महिला दिनानिमित्त एस. जी. वाघ यांनी महिलांचा विविध क्षेत्रात वाढणारा सहभाग तसेच कृषि क्षेत्रात महिलांचे योगदान व उपलब्ध संधी याविषयी माहिती दिली. एम. पी. सैंदाणे यांनी कृषि विभागाकडे असलेल्या विविध योजना व त्यांचे फायदे याविषयी माहिती दिली. पिक विमा योजना व गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजाना यांची माहिती एच. बी. देशमुख कृषि पर्यवेक्षक, सोयगांव यांनी यांनी दिली. महात्मा गांधी रोजगार हमी व महाडीबीटी योजनेबद्दल के. एम. अहिरराव कृषि सहाय्यक पळसखेडा यांनी माहिती दिली.

# देहूमध्ये लाखो भाविकांच्या उपस्थितीत बीज सोहळा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांचा ३७५ वा बीज सोहळा गुरुवारी ९ मार्च मोठ्या आंनदात देहूमध्ये पार पडला. तुकोबांच्या या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने वारकरी देहूनगरीत आले होते. जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच आजच्या दिवशी सदेह वैकुंठ गमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचे बीज सोहळ्याचे ३७५ वर्षे आहे. या निमित्ताने देहू नगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी देहूत दाखल झाले होते. पहाटे तीन वाजता मुख्य देऊळवाड्यात काकड आरती झाली. पहाटे चार वाजता संस्थानचे विश्वस्त, अध्यक्ष मंडळ, वंशज, वारकरी यांच्या हस्ते श्री पूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात महापूजा झाली. पहाटे साडेचार वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पूजा झाली. पहाटे सहा वाजता वैकुंठगमन स्थान येथील संत तुकाराम महाराज मंदिरात महापूजा झाली.

सकाळी साडेदहा वाजता पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले. त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात देहूकर महाराजांचे कीर्तन झाले. दुपारी बारा वाजून दोन मिनिटांपर्यंत तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले.



महाराष्ट्र Business Katta












# शकुनीच्या कळपात उद्धवसेना



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**"हवस सत्ता की सच सुनने की आदत बेच देती है हया को, शर्म को आखीर सियासत बेच देती है। निकम्मेपन की बेशर्मी अगर आंखो मे चढ जाए तो फिर औलाद भी पूरखों की विरासत बेच देती है।" राजकारण नेहेमीच गरमागरम असते. जे गरमागरम नसते त्याला राजकारण तरी कसे म्हणावे? सत्ताधारी असो वा विरोधक नेहेमीच खुर्चीसाठी चढाओढ नव्हे तर आपापसात कुरघोडी करत असतात. बुद्धिवंत नेहेमीच म्हणतात, सत्तेची नशा ही मद्याच्या नशेपेक्षा कैक पटीने तीव्र असते. त्यात प्रमाणिकपणाला किंमत नसते आणि प्रामाणिक लोक राजकारण करू शकत नाहीत.**

ज्याला घरातून निघताना आपल्या धर्मपत्नीलाही खोटे किंवा उल्लू बनविण्याची सवय असते तेच राजकारण व्यवस्थित करू शकतात. असे राजकारण कायम टिकून राहतात नाही जनता त्याचा सोक्षमोक्ष लावण्यास समर्थ असते. हे भारतीय लोकशाहीने नेहेमीच दाखवून दिलेले आहे. सत्ता प्राप्तीसाठी राजकारणी मात्र कुठल्याही थराला जाऊन कार्य करतात ही वर्तमान राजकीय संस्कृती झाली आहे. बऱ्याचश्या महानुभवांकडून असे ऐकीव आहे, "राजकारणात कायम कुणी मित्र अथवा शत्रू नसतो". प्राप्त परिस्थितीत सत्ता हव्यासापोटी जिवलग मित्रही कधीकधी कट्टर शत्रू होतात. या वाक्यावरून मला कधी कधी प्रश्न असा पडतो, जर मित्रत्वात जीवलगता असेल तर स्वार्थासाठी शत्रुत्व का बरे करावे ? एखाद्या वेळी दोघांनीही परस्परांच्या हितासाठी थोडीबहुत माघार घेतली तर तेथे पुरुषत्व कोठे कमी पडणार ? पण अहंकार माणसाला सुधार पडू देत नाही शिवाय बुद्धी व अनुभवाच्या अपरिपक्व अभावामुळे माणसातला माणूस गप्प कधी बसत नाही. असे सहनशीलतेचे विचार इतरांसमोर बोलून दाखविले तर आजूबाजूचे लोक जीवलगपणाच्या नात्यात खोडे घालून अकारण समोरच्याचा अहंकार जागृत करतात. त्याचे विपरीत परिणाम भविष्यात काय होतात याची जाणीव अहंकारीक व्यक्तिमत्वाला लवकर होत नाही. स्वनिश्चयी व्यक्तिमत्त्व नसल्यामुळे एकमेकांविरोधात वातावरण निर्मितीस मदत होते.

महाभारतात शकुनी मामाने त्याचा भाच्चा दुर्योधनाला राज गादीवर बसविण्यासाठी अगदी खालच्यातल्या खालच्या थरावर जाऊन वेळोवेळी दुर्योधनाचा अहंकार वाढवून शेवटपर्यंत वाईटातल्या वाईट गोष्टींचा वापर करून संबंध महाभारत घडविले. शेवटी धृतराष्ट्र व दुर्योधनाच्या हाती काय लागले याचा इतिहास सर्वांना चांगलाच ज्ञात आहे. महाभारतात शकुनीसह कौरवांना कुणीही चांगले म्हणत नाही. अशा विकृत वृत्तीमुळे कौरवांच्या हातून राज्य तर गेलेच पण भारतीय संस्कृतीच्या इतिहासत अशा आशयाचा एक काळाकुट्ट विषय म्हणून नोंद आहे. मित्रहो, महाभारतात फक्त एकच शकुनी होता ज्याने भाच्याच्या प्रेमापोटी असा सर्व विकृत व विनाशकारी वृत्तीचा वेळोवेळी डाव मांडून कौरव-पांडव पुत्रांत कायम दुही निर्माण केली. नेमकी अशीच परिस्थिती आज महाराष्ट्रातील उबाठा सेनेत काही विकृतांनी निर्माण करून पन्नास वर्षांच्या जाज्वल्य हिंदुत्वाला सुरुंग लावला. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंनी कधीच कुठल्याही गोष्टींची अपेक्षा न ठेवता एवढे मोठे संघटन उभे केले. केवळ नुसते बाळासाहेब यांचे नाव जरी कुणीही "वाकड्या" नजरेने घेतले तर संबंध हिंदुत्ववादी सैनिक निस्वार्थपणे एकत्र येऊन समोरच्याच्या उरात धडकी भरवीत असत त्यातूनच देशभक्तीसह समाजकल्याणाचे धेय्य साध्य होत असे. म्हणून तर कुठल्याही राजकीय मोहाला बळी न पडता एवढे मोठे संघटन साम्राज्य एकछत्री अमलाखाली कायम मजबूत ठेवणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नव्हते. त्यासाठी लागली ती संवेदनशील मनासह त्याग, समर्पण व देशभक्तीची भावना. त्यांच्यासोबतही "गणोजी शिर्क्यांची" औलाद रहात असे. पण त्यांचा



कायम बंदोबस्त करण्यात ते तरबेज होते. भावनिक खेळाला ते कधी आहारी जात नसत. मित्र ते मित्र आणि शत्रू ते शत्रू याच विचारांची त्यांची कार्यपद्धत, वेळ प्रसंगी ते सत्तेत नसतानाही विरोधकांना पण आपल्या बुद्धीचातुर्याने नमवत. खरे काय खोटे काय किंवा चांगले काय वाईट काय याची चांगली जण त्यांना होती म्हणून ते नेहेमी पायातले कधी डोक्यावर घेत नसत. एक उत्कृष्ठ राजनीतीज्ञ म्हणून ते सर्व परिचित होते. हे सर्व स्वाभिमानी गुण त्यांच्या चिरंजीवांना जमले नाहीत व आपल्या अस्तिनातील साप ओळखण्यास उद्धवजी कमी पडले. शत्रूला मित्र समजून शकुनीसारख्या अनेक मित्रांसमेत राहून सत्तेसाठी हातमिळवणी करून व त्यांच्या बहकाव्यात येऊन वडिलांनी निर्माण केलेले जाज्वल्य साम्राज्य काही क्षणात विसरून "खुर्चीच्या" मोहापायी शत्रूच्या कळपात शामिल होऊन सत्तालालसेपोटी आपला स्वतःचा व सोबत राहणाऱ्यांचा धेय्यवाद शत्रूच्या दावणीला बांधला. ही मोठी चूक त्यांच्याहातून झाल्याने त्यांच्या बेगडी हिंदुत्वाचे "बारा" तर वाजलेच सोबत अहंकारी कान भरवणी बळी पोटी होत्याचे नव्हते झाले.

उदाहरण म्हणून घ्यायचे असल्यास नागालँड चे ताजेच उदाहरण घेऊया ना. केवळ सत्तेच्या लालसापोटी जे तुमचे सध्याचे मित्र आहेत त्यांनी व्यक्तिगत समर्थनाच्या नावाखाली आपणास आणि आपल्या भावनांना विचारात न घेता परस्पर पाठिंबा देऊन मोकळे झाले. मान्य आहे राजकारणात कायम कुणी कुणाचे शत्रू अथवा मित्र नसतात पण स्वार्थी व मतलबी मित्रत्वामुळे स्वतःचे अस्तित्व टिकत नाही. सत्तेच्या लोभापायी सभोवतालच्या शकुनीच्या सांगण्यावरून आपण हा राजकीय बुद्धिबळाचा डाव हारलात. सर्वच जण काही जवळचे नसतात. या सर्वपरिस्थितीचे परिपूर्ण अवलोकन करण्यास आपण कमी पडल्यामुळे अनेक शकुनीच्या कळपात अडकलात. आजही आपल्यासोबत अनेक शकुनी आहेत. कुणी वायफळ बडबड करून तर कुणी कायम आपली स्तुती करून आपणास चक्रव्यूहात अडकवतात. खरे जिवलग मित्र सोडून आपण सर्वकाही गमावून बसलात. उद्धवजी छत्रपती लढाईत हारले पण तहात जिंकून त्यांनी परत स्वराज्य कसे उभे केले अशी चाणाक्यनीती आपणास जमली नाही. अजूनही वेळ गेलेली नाही आपण शकुनीच्या विळख्यात नसून कळपात आहात म्हणून आपणास अशा कळपातून आग्र्याच्या सुटकेप्रमाणे केंव्हाही निसटता येते पण विळख्यातून नव्हे. जरा चाणाक्षपणे विचार करा मित्र ते मित्रच असतात त्यात वैचारिक अंतर असू शकते पण शत्रूसारखे ते घातक कधीच नसतात. म्हणून आपणास जनमत नम्रपणे विनंती करते की झाले गेले विसरा, अहंकार दूर ठेवा, शत्रूच्या गोटात जाऊन आसरा घेण्यापेक्षा मित्राच्या कोठ्यात आश्रयाला जा. चाणक्यनीतीचा अंगीकार करून विस्कटलेल्या आपल्या पूर्वजांच्या साम्राज्याची घडी नीट बसवा जी स्वर्गीय बाळासाहेबांना अपेक्षित होती. आपणास असे वागण्याची सुबुद्धी येवो म्हणून आपले तमाम सैनिक अजून गतवैभवाच्या प्रतीक्षेत आहेत. राजकारणात कधीकधी जसे शत्रुत्व विसरावे लागते तसे कधीकधी झालेगेले विसरून मित्रत्वाला धरून चालण्यातच भविष्याची घडी नीट बसते. आजही महाराष्ट्रातील तमाम हिंदुत्ववादी जनता आपल्या फेरविचारांच्या प्रतीक्षेत आहे. म्हणून जाताजाता एवढेच म्हणावे लागेल उबाठा सेना ही शकुनीच्या कळपात अडकलेली असल्यामुळे त्याची सुटका होणे गरजेचे वाटते.

# सावित्रीच्या लेकी: सर्व क्षेत्री चकाकी!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणारऽऽऽ.. अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या..**

सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवासे- पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महाराष्ट्रात महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना शिक्षणसम्राट महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

**"विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन॥"**

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षांच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वतः शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

**"इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे॥
इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे॥
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।"**

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

**"काळरात्र गेली। अज्ञान पळाले॥
सर्वे जागे केले। सूर्याने या॥
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य॥
तेजस्वी अपूर्व। उगवला॥"**

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणारऽऽऽ..



अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

**"स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!
त्यांची गोड वाणी मनी घुमे!!
महार मांगाची करते मी सेवा!
आवडीच्या देवा स्मरूनिया!!"**

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

**"बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।। ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।। ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।
मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।
नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।
शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।
राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।
यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।
'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।
असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।
परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठ।।"**

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का ? प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

# जलसाक्षर होणे काळाची गरज !!

आधुनिक केसरी

**सद्या आपण जल है, तो कल है असे नुसता म्हणतो मात्र प्रत्यक्षात त्याची कृती होतांना दिसून येत नाही हे वास्तव आहे आज मुंबई सारख्या महापालिकेच्या नागरी वसाहतींत विशिष्ट वेळेत तर गावठाणांमध्ये चोवीस तास पाणीपुरवठा केला जातो मात्र या दोन्हीही ठिकाणी जबाबदार घटक पाण्याची नासाडी करतांना दिसतात अशीच अवस्था बऱ्याच ठिकाणी होताना होत असते.**

या ठिकाणची जनता 96 टक्के साक्षर असल्याचे सांगितले जात असले तरी जलसाक्षरतेत ते कमी पडताना दिसतात पाणी म्हणजे जिवन आहे त्याचा वापर योग्य आणि आवश्यक तेवढाच करणे हि काळाची गरज बनली आहे तापमानाचा पारा वाढतच असल्याने उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे, सकाळी दहा नंतर उन्हाचे चटके बसू लागल्याने अंगाची लाही,लाही होत असून बालचमू, वृध्दांना त्याचा अधिक त्रास होत आहे उन्हाळा म्हंटल की डोळ्यासमोर पाणी उभा राहते उन्हाळ्यामध्ये पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात असते आणि याच दरम्यान पाण्याचे उपलब्ध झरे अटण्याच्या मार्गावर असतात मात्र आजही काही भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी कामधंदा



सोडून तासनतास दाहीदिशा वणवण भटकावे लागते, महिला,मुले यांचे अतोनाथ हाल होत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही त्यासाठी मिळेल त्या पाण्याचा योग्य वापर केला पाहिजे त्याचा गैर वापर होता कामा नये पाणी मुबलक मिळत असल्याने त्याची किंमत कळत नाही नळाला पाणी येते त्यावेळी भरून झालेनंतर तो नळ बंद करणे गारजेचे असताना तसाच तो सुरू ठेवला जातो त्यामुळे पाणी वाया जाते तसेच भरपूर लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाते त्या ठिकाणी पाण्याच्या ग्लासचा आकार छोटा ठेवला तर बरेच पाणी वाचू शकेल अशा ठिकाणी अर्धाच ग्लास पाणी वापरून बाकीचे पाणी सहसहा फेकून दिले जाते त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते पाणी दुर्मिळ वस्तू बनत चालली आहे याची आता आपल्या सर्वांना जाणीव व्हायला लागली आहे. जितके काटकसरीने आपण ते वापरु तितके ते जास्त दिवस पुरणार आहे. पाणी ही एक जीवनावश्यक बाब आहे. त्यामुळे ते वापरावे लागणारच आहे पण ते वापरत असतांना जरा थोडे जपून अथवा काटकसरीने वापरले तर त्यात निव्वळ आपलेच नव्हे तर समाजाचेही भले आहे !!

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# लाखो दिलों की धडकन डॉ. एम.के. इनामदार..!

आधुनिक केसरी

**आज समाजामध्ये डॉक्टरकडे खुप आदराने आणि सन्मानाने बघितले जाते कारण जेंव्हा आपण एखाद्या आजारापुढे रोगापुढे हताश आणि निराश होऊन अक्षरशा हात टेकून देत धीर सोडून देत असतो.तेंव्हा ह्या अशा निराशेच्या परिस्थितीत आपल्याला एकच व्यक्ती दिसते जो आशेचा किरण दाखवत असतो आणि ती व्यक्ती म्हणजे डॉक्टर आज आपण डॉक्टरांना देवाचा दर्जा देतो कारण तीच एक अशी व्यक्ती असते जी आपल्याला गंभीरातील गंभीर आजारातुन देखील ठणठणीत करत असते.**



मृत्युच्या दारातुन आपल्या अथक परिश्रम आणि प्रयत्नांनी सहीसलामत बाहेर घेऊन येत असते.

आजच्या लेखात आपण ह्याच समाजातील एका प्रतिष्ठित व्यक्तीमत्वाविषयी सविस्तरपणे माहीती जाणुन घेणार आहोत. माळशिरस तालुका किंवा सोलापूर जिल्हाच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रातील अनेक गोर-गरीब व गरजू रुग्णांचे जीव वाचवणारे जमिनीवरील देवमाणूस व देवदूत म्हणून महाराष्ट्रभर ओळख असणारे महाराष्ट्रातील टॉप टेन ह्रुदयरोगतज्ञांपैकी एक ह्रुदयरोगतज्ञ आदरणीय डॉ.एम.के इनामदार होय. वय वर्ष-71असूनही एखाद्या पंचवीशीतल्या तरुणासारखे शेकडो बेड/आय.सी. यू.मधील सिरीयस रुग्णांसाठी 24 तास तत्परतेने सेवा देणारे, माफक व अल्प दरात गोर-गरीबांना सेवा देणारे,सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताच्या योजना राबविणारे, आपूलकीच्या भाषाशैलीतून पाठीवर हात फिरवून रुग्णांना धीर-दिलासा देणारे, एकुण 300 कर्मच्यार्यांचा स्टाफ एका कुटुंब प्रमुखाप्रमाणे सांभाळणारे असे सर्व गुणसंपन्न असणारे डॉक्टर कोण म्हणून असे हजारो प्रश्न उपस्थित झाले तर उत्तर मात्र एकच येणार ते उत्तर म्हणजेच माळशिरस तालुक्यातील अकलुज येथील अश्विनी हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.एम के.इनामदार होय. कोणतीही लेजर किंवा अधुनिक सिस्टम नसताना त्याकाळी माजी सहकार मंत्री स्वर्गीय प्रतापसिंह शंकरराव मोहीते-पाटील यांच्या अन्न नलिकेचे सुरळीत ऑपरेशन करुन प्रसिद्धीच्या झोतात आले. आणि तेथूनच डॉ.एम के. इनामदार हे नाव चर्चेत आले. गेल्या 44 ते 45 वर्षापासून रुग्णांना अखंडीत व दर्जेदार सेवा देणारे हे एकमेव डॉक्टर आहेत.यांच्या याच निस्वार्थी कामाची पोहच पावती म्हणून जगातील बलाढ्य व श्रीमंत अशा चक्क अमेरीका या देशाची फेलोशिफ मिळाली. अमेरीका या देशाची फेलोशिफ मिळविणारे डॉ.एम के. इनामदार हे महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील पहीले डॉक्टर आहेत. सदरची फेलोशिफ मिळाल्यानंतर त्यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत होता.गणितही लावता येणार नाही इतक्या लोकांच्या कमजोर झालेल्या व संत गतीने चालत असलेल्या ह्रुदयाला आपल्या कौशल्यातून गती देवून "लाखों दिलोंकी धडकन" बनलेल्या डॉक्टर एम.के इनामदार यांना व त्यांच्या निस्वार्थी कार्याला सॅल्यूट..!

**संकलन**
**सुजित सातपुते,पिलीव**
**मोबा.नं - 9595631724**

# क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले स्मृतिदिन विशेष



डॉ. प्रवीण बनसोड
संपर्क क्र. 9423425129

आधुनिक केसरी

**भारतात शेकडो वर्षापासून स्त्री आणि शूद्रांना ज्ञानापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न झाला, तो अद्यापही सुरूच आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत निरक्षर सावित्रीमाईंनी आपले शिक्षण पूर्ण करावे आणि शिक्षणप्रसारासाठी आपले आयुष्य झोकून द्यावे, यास एकोणविसाव्या शतकातच काय, पण विसाव्या शतकातसुद्धा जोड नाही, हे एक अपूर्व व अदितिय उदाहरण होय. स्त्री म्हणून लादण्यात आलेले ज्ञानप्राप्तीचे बंधन सावित्रीमाईंनी झुगारून दिले. एवढेच नव्हे तर संपूर्ण भारतीय उपखंडाला शिक्षणप्रसाराची नवी दिशा दिली.**

ज्ञान नाही विद्या नाही ते घेनेचि गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही, तयास मानव म्हणावे का ?

असा प्रश्न करून ज्ञानमार्गाचे महत्त्व सावित्रीमाई करतातः ज्ञानावर आधारीत समाजाची उभारणी करण्यासाठी शिक्षणमार्गाशिवाय दुसरा पर्याय असू शकत नाही, हे तत्त्व ओळखून सावित्रीमाईंनी शिक्षणप्रसार हेच जीवनाचे उद्दिष्ट मानले. त्यांच्या-संदर्भात नारायण महादेव उर्फ मामा परमानंद म्हणतात, जोतिबांपेक्षा त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी ? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले, त्यांच्याबरोबर राहून वाटयास येतील त्या हालअपेष्टा भोगल्या. उच्चवर्णीयांतील उच्चशिक्षण घेतलेल्या स्त्रियांतही अशा प्रकारची त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. त्या उभयतांनी लोककार्यार्थ आपले सारे जीवन खर्च केले.शिक्षण, सामाजिक न्याय, आणि री समतेसाठी त्यांनी केलेले कार्य वर्तमान आणि भविष्यालाही नवी दिशादेणारे आहे. सावित्रीमाईंनी अपार कष्टाने निर्माण केलेले शैक्षणिक कार्य जेवढे मौल्यवान आहे, तेवढेच समृद्ध ही आहे. १८५४ साली 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह, १८५६ साली 'बावनकशी सुबोध रत्नाकर लिहून सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची रूपरेषा त्यांनी मांडली. त्यामुळे भारतातील पहिल्या महिला शिक्षिकेचा मान तसाच जसा त्यांच्याकडे जातो, आय आधुनिक कवयित्रीचा मानसुद्धा त्यांच्याकडेच जातो. त्यांच्या कवितेतून निसर्ग जसा बोलका होतो, तसेच भविष्यातील शिक्षण- विचारांची दिशा सुद्धा प्राप्त होते. जोतीरावांच्या कार्यास नमन करतांना त्या म्हणतात-

**जोतिबांना नमस्कार ।मनोभावे करतसे ||**
**ज्ञानामृत आम्हा देई।**
**अशा जीवन देतसे ॥**
**थोर जोति दीनशुद्रा। अतिशूद्रा हाक मारी।।**
**ज्ञान ही ईर्ष्या देई।**
**तो आम्हाला उद्धारी ॥**

जोतीरावांनी केलेल्या ज्ञानकार्याची महती सांगून शिक्षणानेच मनुष्यत्व प्राप्त होईल, असे त्या सांगतात-

**शूद्रांना सांगण्याजोगा ।**
**आहे शिक्षण मार्ग हा || शिक्षणाने येई मनुष्यत्व |**
**पशुत्त्व हटते पहा |**

केवळ शिक्षण प्राप्तीनेच 'मानव ते मनुष्य' असा प्रवास सुखकर होऊ शकतो, असे सावित्रीमाई सांगतात. इतर प्राणी आणि मनुष्यप्राणी यांच्यामध्ये असणारा मुलभूत फरक म्हणजे मनुष्याकडे असलेली ज्ञानप्रातीच्या प्रचंड मनुष्य ज्ञानप्राप्ती आस. है ओढीने आजचा आधुनिक वाटचाल करीत आहे, त्यासाठीची पहिली पायरी म्हणजे शिक्षण होय. विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळेच मनुष्याचा विकास होणार आहे, असेच सावित्रीमाईना सुचवायचे असेल, म्हणून अनिहाय पोटतिडकीने त्याम्हणतात- त्याचा अंगीकार करील ... यावरून जोतीबा व सावित्रीबाई यांच्या वैयक्तिक पत्रव्यवहारात सुद्धा शिक्षणाची चर्चा घडून येत असे, असे स्पष्टपणे दिसते. 'विद्यादान' या निबंधात, " शूद्रादी अतिशूद्रांजवळ निःसंशय अनेक गुण वसत असून अज्ञानामुळे त्यांना आपल्या बुद्धीचा व कौशल्याचा उपयोग कसा व कोठे करावा हे माहित नाही असे लिहितात. यावरून सावित्रीमाईंच्या चिंतनात



बहुजनांचे शिक्षण का महत्त्वाचा विषय असल्याचे स्पष्टपणे जाणवते. कविता, निबंध, भाषणे व पत्रांमधून त्यांनी शिक्षणाची दिशा स्पष्टपणे मांडली. त्यांनी दाखविलेली शिक्षणप्रसाराची सूत्रे आजही प्रेरणादायक असून त्यावर तातडीने अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

# बार्टी समोर धरणे आंदोलन आता दवंडी मोर्चा

आधुनिक केसरी

**धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रधान भारत देशात गेल्या 75 वर्षात सामाजिक समता प्रस्थापित झाली नाही प्राचीन काळापासून काही ठराविक धर्माची जातीची मक्तेदारी राहिली आहे जात निर्मितीच्या इतिहासातील शेवटच्या व खालच्या तळाला असलेल्या जाती त्यातील शूद्र अतिशुद्र गणल्या गेलेल्या जाती त्यातील होलार,मांग, बुरूड, मेहतर, भंगी, चर्मकार, ढोर, गारुडीमांग, डकलवार, पेंडेमांग, मोची, खाटीक.... अशा अनेक जाती ज्या आजही शोषित वंचित उपेक्षित व विविध विकास योजनेपासून कोसो दूर आहेत .**

या समाजाची शैक्षणिक, सामाजीक, आर्थिक उन्नती आजही झाली नाही व राज्यकर्ती जमात तथा वर्गआर्थिक सशक्त जाती कुटुंबे जे की स्वतंत्र्यापासून आजतागायत काही ठराविक कुटुंब सत्तेला चिटकून असणाऱ्या पांढरपेशी वर्गाने आजतागायत ह्या जाती जाणीवपूर्वक वंचित ठेवल्या गेल्या आहेत संविधानाने हमी देणाऱ्या कलमाची आजही अंमलबजावणी होत नाही हे राज्यकर्ते जमातीचे अपयश आहे वंचित शोषित जाती आजही संविधानावर प्रेम, विश्वास, श्रद्धा ठेवून सामाजिक न्यायासाठी व समाजाची उन्नती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत॰ राज्यकर्ते विविध कारणे मातंग समाजाला झुलवत ठेवत आहेत क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग 2003ला नेमला गेला आणि 2008 ला सादर केला तेव्हापासून आजपर्यंत गेल्या वीस वर्षात मातंग समाज आंदोलनाच्या पावित्र्यात आहे अजूनही विकासाच्या प्रवाहात घेण्यासाठी राज्यकर्ते तयार होत नाहीत असेच मनावे लागेल "धर्माने निर्माण केलेल्या जातीय तेचि उतरंड जोपर्यंत क्रांती आणि संघर्षाने फोडून काढत नाही तोपर्यंत त्या वर्गात समता येत नाही" त्याचप्रमाणे आपल्या न्यायासाठी आक्रमक भूमिका घ्यावीच लागते जर मातंग समाजाने आक्रमक भूमिका घेतली नसेल तर अजून किती काळ जाईल हे सांगता येणार नाही म्हणून या आंदोलनाचा एक भाग म्हणून विविध स्तरातून समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचारा संदर्भात आवाज उठवण्यासाठी जवाब दो नारा देऊन सरकारला जॉब विचारण्यासाठी 22 फेब्रुवारी 2023 रोजी महाराष्ट्राच्या राजधानीत मुंबईतील आझाद मैदानावर मातंग समाजाने जबाब दो आंदोलन झाले या आंदोलनात सरकारला आमचा वाटा, हिस्साचा जॉब विचारण्यात आला सामाजिक संघटना व राजकीय पक्ष आणि राजकीय नेते आंदोलनात सहभागी होते काही सत्ताधारी पक्षातील नेते होते तर काही विरोधी पक्षातील. भाजपा शिंदे गट सत्ताधारी पक्षाचे आमदार मंत्री शंभूराज देसाई यांनी या सभेला हजेरी लावली व निवेदन स्विकारुन आश्वासनही दिले सत्ताधारी



पक्षात काम करणारे मातंग समाजाचे काही नेते मंडळी माझे पक्षात कसे बल वाढेल व स्व फायदा कसा होईल ही भावना ठेवून काही काम करताना दिसत होते परंतु सत्ताधारी पक्षात काम करणारे नेते हे विसरले आहेत की काय जर समाजाचे नेतृत्व हे सत्ताधारी पक्षाचा भाग असेल आणि अशा नेत्याला आंदोलन करून मवाळ भूमिका घेऊन सरकार दरबारी प्रश्न मांडावा लागत असेल तर ही शोकांतिका आहे जर या सत्तेतील मावळ नेत्यांनी सामाजिक संघटनेला दबाव गट निर्माण होऊ देत नसल्यास समाजाची मोठ्या प्रमाणात नुकसान होते हे विसरलेत का स्वतंत्र्याच्या 75 वर्षात आजपर्यंत सत्तेवर बसलेले पक्ष कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपा, व इतर पाठिंबा देणारे संघटना यांनी कधीही मातंग समाजाच्या मूळ प्रश्नावर चर्चा केली नाही व ऐरणीवर घेतला नाही म्हणून जवाब दो आंदोलन आझाद असलेल्या मैदानावर छेडत असताना समाजातील आक्रमक असलेली लोकस्वराज्य आंदोलन या सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.रामचंद्र भराडे आक्रमक भूमिका घेत असताना त्यांना तथाकथित काही नेते रोखताना दिसत होते आक्रमक भूमिका मांडल्याशिवाय व संघर्ष केल्याशिवाय समाजाचा प्रश्न पुढे जात नाही व न्याय मिळत नाही असे असताना सुद्धा काही ज्येष्ठ नेते मंडळी मवाळ भूमिका घेताना दिसत होते महाराष्ट्रामध्ये प्रभावी व आक्रमकपणे प्रश्न मांडताना लोकस्वराज आंदोलन दिसून आले परंतु सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच बरेच विधानसभा सदस्यांनी मातंग समाजाच्या प्रश्न मांडताना दिसले पण मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाचा अभ्यास केलेला नाही व अधिवेशनापुरते मर्यादित असणारे सामाजिक न्याय मंत्री अभ्यास पूर्ण उत्तरे देऊशकले नाहीत त्यांनी आयोगाचा सुद्धा अभ्यास केलेला नाही सामाजिक न्याय खाते राजाच्या मुख्यमंत्र्याकडे असताना सुद्धा त्यांनी या प्रश्नाला बगल दिलेली आहे आणि सामाजिक न्याय मंत्री यांनी तर वर्गीकरण करता येत नाही अशा प्रकारचा खुलासा केला इतर मागासवर्गीय मध्ये एन टी मध्ये अ ब क ड असे वर्गीकरण होते तर अनुसूचित जाती मध्ये का होत नाही हा प्रश्न मातंग समाजासमोर येतो आणि सरकारला घेण्यासाठी आपला प्रश्न सोडवण्यासाठी पुन्हा पुन्हा मातंग समाजाला या प्रश्नावर आंदोलन केल्याशिवाय गत्यंतर राहत नाही शासन, प्रशासन रावीत असलेल्या योजना सशक्त जातीपर्यंत पोहोचतात आणि अशक्त जाती योजनेपासून मागे राहतात योजना समान जातीमध्ये वितरण होत नाही म्हणून मातंग समाजाने वर्गीकरणाची भूमिका मांडतो तेव्हा सरकार बहिऱ्याचं सोंग करते की काय असं वाटते तेव्हा आपल्या न्याय हक्कासाठी अनुसूचित जातीतील जे विकासापासून दूर आहेत त्यासर्व जातींना एकत्रित घेऊन आपला न्याय हक्काचा लढा अधिक गतिमान करावा लागेल समस्या सोडवण्यासाठी राज्यकर्त्या जमातीला भाग पडले पाहिजे अन्यथा राज्याचा खुर्चीवर दूर केले पाहिजे अशा प्रकारची राजकीय भूमिका मातंग समाजाला येणाऱ्या काळात घ्यावी लागणार आहे तसेच अनुसूचित जातीची भूमिका असली पाहिजे. जोपर्यंत राजकीय सत्ता हस्तगत करत नाही तोपर्यंत आपण सर्वच प्रकारच्या न्यायापासून विकासापासून वंचित राहू यासाठी राजकीय सत्ता मिळवणे गरजेचे आहे मातंग समाजासह तत्सम अनुसूचित जातीतील वंचित गटाचा शोध घेतला पाहिजे शोध घेता येत नसेल तर त्यांना त्यांचा हिस्सा वाटा दिला पाहिजे यासाठी मातंग समाजाने सरकारला त्यांची जागा दाखवण्यासाठी लोकस्वराज्य आंदोलन सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनी दवंडी मोर्चाचा आयोजन केला आहे ॲड. दत्तराज गायकवाड यांनी बार्टी या कार्यालयासमोर 13 फेब्रुवारी 2023 पासून आज पर्यंत म्हणजे 23 दिवसापासून धरणे आंदोलन करत आहेत या आंदोलनाकडे सरकारने प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत याचाच भाग म्हणून दवंडी मोर्चाचा आयोजन करण्यात आले आहे शासनास वर्गीकरण करण्यासाठी भाग पाडण्यात येईल ही आंदोलनाची भूमिका असेल या आंदोलनात मातंग समाज सहभागी व्हावा.

**शिवाजी बर्दापुरे, नांदेड**

# पाडे-निगडोळ-चारोसा रस्त्याची दुर्दशा

## आठ दिवसांत रस्त्याची दुरूस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यातील रस्त्याची स्थिती अत्यंत दयनीय झाली असून आता तालुक्यातील जनता आंदोलनाचा पवित्रा घेणार आहे. आठ दिवसांत दुरूस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन दिंडोरीचे तहसीलदार पंकज पवार यांना देत नागरिकांनी इशारा दिला आहे. तालुक्यातील पाडे-निगडोळ-चारोसा या रस्त्याची गेल्या अनेक दिवसांपासून न घरका न घाट का अशी स्थिती झाल्यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

रस्त्याच्या कामांना मंजुरी असतांना ही ठेकेदारांच्या आडमुठेपणामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या महत्वपूर्ण रस्त्याची गेल्या अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली असल्याने वाहनधारकांची दिवसेंदिवस डोके दुःखी वाढत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहने कशी चालवावी यांचे समीकरण जुळवितांना अपघात होऊ लागले आहे.हा रस्ता वर्दळीचा असल्याने या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असते.हे काम मंजूर असुन ठेकेदाराने केवळ जनतेला आशा निर्माण होण्यासाठी खडी आणून टाकली आहे.त्यामुळे नागरिकांची दिशा भुल होण्याचा प्रयत्न केला जात आहे.त्यामुळे रस्त्याचे काम जैसें थे आहे. ठेकेदार ही उडावाउडावीचे उत्तर देत आहे. लोकप्रतिनिधी च्या आदेशाला न जुमनता ठेकेदार मनमानी करत असल्याने सदर ठेकेदारांऐवजी दुसऱ्या ठेकेदाराला रस्त्याचे काम करण्यासाठी वर्ग करावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.याबाबत नागरिकांनी दिंडोरी चे तहसीलदार पंकज पवार यांना लेखी निवेदन नुकतेच दिले आहे. आठ दिवसांत सदर रस्त्याचे काम सुरू न झाल्यास वलखेड फाटा येथे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी शरद मालसाने,श्यामभाऊ हिरे,संतोष वाघ,बाळासाहेब हिरे,नाना मोरे, कृष्णा रेहरे,घनश्याम वाघ,प्रीतम गांगुर्डे, सुनील पवार, हिरामण गावित,पिंताबर चौधरी, किशोर रेहरे,संजय रेहरे,राजकुमार पगारे,अशोक गोडे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंडोरी तालुक्यातील रस्त्यांची दुर्दशा झाली असून त्यांच्या दुरुस्तीसाठी नागरिकांच्या वतीने तहसीलदार पंकज पवार यांना निवेदन देण्यात आले .

पाडे-निगडोळ-चारोसा रस्त्यावर सध्या मोठमोठे पडलेले असुन काही महिन्यांपूर्वी उमराळे खुर्द येथील एका महिलेची रस्त्यालाच प्रसुती झाल्याने नवजात बाळाचा मुत्यू झाला होता . या रस्त्यावर ऊस वाहतूक करणारे टॅक्टर सतत उलटत असतात . शेतीमाल घेऊन जाणाऱ्या पिकअप उलटल्याने शेतकऱ्यांचे शेती मालाचे नुकसान होत आहे . रात्रपाळीला कंपन्यामध्ये कामांसाठी जाणाऱ्या तरूणांचे दुचाकी घसरून अपघात वारंवार होत आहे . यामुळे अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे .



# संविधान- लोकशाही वाचवण्यासाठी महिला सक्षम- प्रा.डॉ. अहिरे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि.०८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने गांधी भवन , शहागंज, छत्रपती संभाजी नगर येथील सभागृहात आयोजित कार्यक्रमात व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.अरुण शिरसाट शहर जिल्हाध्यक्ष शहर जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी अनु. जा.विभाग यांनी केले होते या कार्यक्रमाला जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा.डॉ.प्रतिभा अहिरे ह्या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या त्यांनी महिलांना बोलतांना सांगितले की, सामजिक चळवळीत सक्रिय सहभाग असणे काळाची गरज आहे, त्याशिवाय आज समाजात जी अमानवी प्रवृत्ती फोफावत आहे ती जागीच थांबणार नाही, त्याकरिता खंबीरपणे काम करा, संविधान तुम्हाला अभय देईल.

शाहू , फुले, आंबेडकर यांचा विचार देशाला तारेला असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण मुख्य संयोजक डॉ.अरुण शिरसाट यांनी केले, याप्रसंगी शहराध्यक्ष शेख युसूफ लीडर, ऍड.इकबालसिंग गिल, माजी जिल्हाध्यक्ष इब्राहिम पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.पाहुण्यांचा परिचय प्रा.शिलवंत गोपणारायन यांनी करून दिला, सूत्रसंचालन डॉ.मिलिंद आठवले तर आभार प्रदर्शन प्रा.सोनाजी गवई यांनी केले. यावेळी रेखाताई राऊत महिला शहराध्यक्ष, अनिस पटेल, सरोज मसलगे पाटील, हेमाताई पाटील, अंजलीताई बांगर, अनिता भंडारी, उज्वला ताई दत्त,आनंद भामरे, उमाकांत खोतकर,मंजू लोखंडे, रवी लोखंडे, किशोर सरोदे, राहुल शिरसाट, अशोक चक्रे दादा, गणेश शिंदे, दीपक पाईकराव, पी बी खोतकर,शिरीष चव्हाण,शकुंतला साबळे, रंजना हिवराळे आदी पदाधिकारी व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# बोरगाव ते पैठण दिंडीचे राजूरमध्ये आगमन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** श्री शिवेश्वर महादेव यांच्या कृपाशीर्वादाने व संत सिद्धांत आध्यत्मिक वारकरी भजनी मंडळ बोरगाव ( बु. ),बोरगाव मठ व बोरी यांच्या संयुक्त विद्यमाने नाथषष्टी निमित्त आयोजित श्रीक्षेत्र पैठण पायीदिंडीचे राजूरमध्ये आगमन होताच दिंडीतील सहभागी वारकरी व भजनी मंडळींचे राजूर ग्रामस्थांच्या वतीने टाळ मृदुंगाच्या गजरात स्वागत करण्यात आले. या दिंडी प्रमुख ह.भ.प.माऊली मार्तंड महाराज व विणेकरी पांडुरंग महाराज जोशी तसेच भोकरदन-जाफ्राबाद तालुक्यातील वारकरी व भजनी मंडळी सहभागी झालेली आहे. या पायी दिंडीचे 6 मार्च रोजी बोरगाव येथून प्रस्थान झाले असून ती 15 मार्च रोजी नाथषष्ठीच्या दिवशी संत एकनाथ महाराज संतपीठ नाथसागर पैठण येथे काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. पायी दिंडीचे राजूर येथे आगमन होताच दिंडी प्रमुख ह भ प माऊली मार्तंड महाराज विणेकरी पांडुरंग महाराज जोशी व इतर वारकरी व भजनी मंडळीचे टाळ मृदुंगाच्या गजरात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.त्यानंतर आरती घेण्यात आली. वारकऱ्यांसाठी भाऊसाहेब नागवे यांनी चहाची तर शंकर गुळवे,विष्णू महाराज,नरसिंग घुगे यांनी नाश्त्याची व्यवस्था केली होती. राजुरी येथील व्यापारी शंकर गुळवे यांनी पालखीसाठी ट्रॅक्टरही उपलब्ध करून दिला. फराळ व चहा-पाणी झाल्यानंतर दिंडीने पैठणकडे प्रस्थान केले.

राजूर येथे दिंडीच्या स्वागतासाठी सुधाकर दानवे, गजानन नागवे, माऊली पुंगळे,शंकर गुळवे, बालुशेठ काबरा, रामेश्वर सावंत,विष्णु महाराज पुंगळे,नारायण डकले,राजू गुळवे, अरविंद देशमुख, दत्ता गिरी, पंकज पिंपळे, भगवान पुंगळे, आप्पासाहेब पिंपळे, संचित पुंगळे, अंकुश सोनवणे, कृष्णा सोनवणे, कृष्णा खांडेभराड, उमेश पुंगळे यासह अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.





# उर्मिला पवार यांच्याकडून महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील उदयोजिका तथा समाजसेविका ऊर्मिला पवार व महिला मंडळ यांच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कन्नड महिला रत्न सन्मान- २०२३ सन्मान 'ति' च्या कर्तुत्वाचा या कार्यक्रमाचे आयोजन करत तालुक्यातील कर्तृत्ववान महिलांचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक, महसूल, पोलीस, वनविभाग, आरोग्य, आरोग्य, कायदा, स्वच्छता, राजकीय या सारख्या अन्य क्षेत्रातील महिलांना बोलावून त्यांचा यथोचित सत्कार करून गुणगौरव करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. ऊर्मिला पवार म्हणाले की, शहरात समाजसेवेच्या माध्यमातून नेहमी सर्वसामान्यांचे प्रश्न, गोरगरिबांची सेवा कशी करता येईल, याचाच ध्यास मी आणि माझे पती मनोज पवार करत असतात. शहराच्या समाजसेवेसाठी आम्ही दोघेही नेहमी कटीबद्ध असणार आहोत. भविष्यात शहराचा सर्वांगीण विकास कसा करता येईल. याकडे आमचा कल असणार आहे. यासाठी फक्त तुमचा आशीर्वाद आम्हाला असणे आवश्यक आहे. महिलांच्या व तरुणींच्या काही समस्या असतील तर नक्कीच सोडवणार यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा उद्योजिका तथा समाजसेविका उर्मिला मनोज पवार, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, माजी जि.प. सदस्य संजना जाधव यासह तन्वी जालनापूरकर, ॲड सुनिता भिलांगे डॉ .मनिषा मोतींगे डॉ रुबीना कुरेशी, नूतन पवार, सरला शिंदे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. या जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्व महिलांना उद्योजक मनोज पवार यांच्या कडून भेटवस्तू देण्यात आली. उर्मिलाताई पवार यांच्या हस्ते महिलांना भेटवस्तू देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विविध क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महिलांसह शहरातील ५०० पेक्षा अधिक महिलांची या समारंभास उपस्थिती होती. सूत्रसंचालन सहशिक्षिका सारिका पवार यांनी केले तर आभार - सहशिक्षिका गाजिया शेख यांनी.

# किनगाव येथे जागतिक महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**किनगाव :** संत गाडगेबाबा स्मारक किनगाव वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गावातील महिला सरपंच मनीषा चव्हाण जिल्हा परिषद शाळेतील के. व्ही. पुंडकर, एस. एस. कापसे, पी. एन. भोरे, यु. आर. कोंडके व गावातील राजकीय शैक्षणिक व शेतकरी वर्गातील महिलांचे स्वागत करण्यात आले . श्रीमती यु. आर. कोंडके यांनी महिला दिनानिमित्त माहिती सांगितली. यावेळी ग्रामविकास अधिकारी अरुण चिते, गावातील प्रतिष्ठित नागरिक तेजराव चव्हाण, सुभाष चव्हाण, सुरेश सोनवणे, पंजाब चव्हाण, किशोर पुसे, बाबासाहेब मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महेंद्र कुंवर मुख्याध्यापक यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे आयोजन संत गाडगेबाबा स्मारकाचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी केले.



# पीरबावडा येथील अवैध देशी दारू विक्री त्वरित थांबविण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** फुलंबी तालुक्यातील राजुर रोडवरील पिरबावडा येथे अवैध दारू विक्री तात्काळ थांबवा अशी मागणी रामेश्वर बोकील, प्रदिप बोकील सामाजिक कार्यकर्ता तथा रहिवासी पिरबावडा यांनी ग्रामिण पोलीस अधिक्षक यांना निवेदनाद्वारे केली आहे. मौजे पिरबावडा तसेच पिरबावडा पंचक्रोशीतिल अवैध दारू विक्री सर्रास सुरु आहे. अवैध दारू विक्रीमुळे सामाजिक स्वास्थ खराब झाले असून ग्रामस्थांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. पिरबावडा हे मुख्य बाजारपेठचे गाव असल्यामुळे याठिकाणी आसपासच्या खेड्यातील नागरिकांची विशेषतः स्त्रिया जेष्ठ नागरिक विद्यार्थी - विद्यार्थिनी यांची रोजची पायपीठ असते. मात्र काही समाजकलंकित व्यापारी स्वतःच्या स्वार्थासाठी गावातील नागरिक, युवा वर्ग यांना आधी मोफत दारू वाटून, त्यांना व्यसनाच्या विळख्यात अडकवण्याचे काम करत आहे. त्याचबरोबर व्यसनाधीन झालेल्या नागरिकांकडून मूळ किमतीच्या दोनपट ते तीनपट किमतीने अवैध रित्या दारू विक्री करत आहेत. ज्या वयात कुटुंबाचा आर्थिक आधार बनण्याची गरज असते, त्याच वयात युवक दारूच्या व्यसनी जाऊन कुटुंबावर गरिबी व भूकमारीचे दिवस आणत आहेत. घरात पिठाला मीठ नाही अशी परिस्थिती असताना दारूमुळे कित्तेक गावकार्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. कित्तेक महिला विधवा झाल्या तर कित्तेक कुटुंब बेघर झाले आहे. अनेक संसार उद्धस्त होत आहे . पिरबावडा येथे जवळपास ९ ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू आहे .भविष्यात या गोष्टी घडू नये यासाठी, सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी, ग्रामीण भागातून गरिबी दूर करण्यासठी, युवकांना सकारात्मक मार्ग दाखवण्यासाठी त्याच बरोबर दारूमुळे होणारे संभावित धोके तसेच जीवितहानी टाळन्यासाठी त्वरित सर्व अवैध दारू विकणार्यांची चौकशी करून त्यांना समज द्यावी. समजदेऊनदेखील दारूविक्रीवर आळा बसला नाही तर महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ अन्वये तथा इतर कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हेगारांवर गुन्हे नोंदवून कठोर कारवाई करावी. अशी मागणी रामेश्वर बोकील, प्रदिप बोकील सामाजिक कार्यकर्ता यांनी ग्रामिण पोलीस अधिक्षक यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# देशाच्या प्रगतीत महिलांचा मोलाचा वाटा आणि सहभाग

## डॉ. काननबाला येळीकर : जागतिक महिला दिनानिमित्त भव्य रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आज वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशांन्वये तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, मा. ना. श्री. गिरीश महाजनजी (वैद्यकीय शिक्षण मंत्री) यांच्या निर्देशानुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त जागतिक महिला दिनानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौक येथून रॅलीचे उद्घाटन डॉ. काननबाला येळीकर (माजी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय), कॅन्सर शल्य चिकित्सक डॉ. उन्मेष टाकळकर, डॉ. संगीता पाटील, जेष्ठ स्त्रीरोगतज्ञ डॉ. प्रेरणा देवधर, CCIM सदस्य आणि नोडल ऑफिसर प्राचार्य डॉ. दत्ता पाटील (उदगीर), अपर्णा अध्यापक या मान्यवरांच्या शुभहस्ते रॅलीला सुरुवात करण्यात आली. डॉ. काननबाला येळीकर यांनी उद्घाटनपर भाषणात मार्गदर्शन करताना सांगितले की महिलांनी देशाच्या प्रगतीसाठी अनेक क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. अनेक यशस्वी



व्यक्तींच्या जीवनामध्ये स्त्रियांचा मोलाचा वाटा असतो. आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात प्रगतीपथावर आहे. पण तरीही तिला अनेक संकटांना सामोरे जावे लागते. स्त्रीने आत्मनिर्भर बनले पाहिजे. कारण पुढची पिढी कशी घडवायची, हे स्त्रीच्या हातात आहे. स्त्री सन्मानाची सुरवात आपण आपल्या घरापासून करायला हवी. माझ्या आयुष्यामधील सर्व महिला वर्गाला माझे शतशः नमन ! रॅलीचा समारोप गुलमंडी, दयाराम बसैये बंधू यांचं दुकान, मॅचवेल, मित्तल ऑप्टिकल मार्ग महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळ, औरंगपुरा येथे झाला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ २५ वा रौप्य महोत्सव साजरा करत आहे. दि. १ जानेवारी २०२३ ते दि. १० जुन २०२३ या कालावधीत विद्यापीठाद्वारे विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त 'ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस अँड ट्रीटमेंट' त्यानंतर दि. २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिन (ओरल हेल्थ मिशन अवेअरनेस) आणि दि. ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिनानिमित्त (कॅटरॅक्ट /थायरॉईड अवेअरनेस) या आजाराबाबत जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाद्वारे करण्यात येत आहे.

यावेळी डॉ. अमित वांगीकर, डॉ. लता काळे, डॉ. संदीप कांबळे, डॉ. शीतल अंतापूरकर, डॉ. वैजनाथ यादव, डॉ. राजन महिंद्र, डॉ. उल्हास शिंदे, डॉ. गणेश डोंगरे, अशोक आहेर, संजय अंबादास पाटील तसेच म. आ. वि. वि. सलग्नित CSMSS आयुर्वेद महाविद्यालय, CSMSS दंत महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय, धनेश्वरी आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, साई आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर, डी. के. एम. एम. होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, फोस्टर डेव्हलपमेंट होमियोपॅथी महाविद्यालय, सायली होमियोपॅथी वैद्यकीय महाविद्यालय, श्री भगवान होमियोपॅथी मेडिकल कॉलेज, स्वातंत्र्यसेनानी स्व. उत्तमराव पाटील परिचर्या महाविद्यालय, कमलनयन बजाज परिचर्या महाविद्यालय, डॉ. हेडगेवार परिचर्या महाविद्यालय, शासकिय दंत महाविद्यालय, आनंद आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, डॉक्टर, विद्यार्थी मोठ्या संख्येने रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी प्रास्ताविक CSMSS आयुर्वेद महाविद्यालय प्राचार्य तथा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्रीकांत देशमुख यांनी केले तर आभार डॉ. अमित वांगीकर, सूत्रसंचालन डॉ. लता काळे यांनी केले.

# किनगाव येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**किनगाव :** येथे माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे नाना यांच्या हस्ते संपन्न झाला. सदरील कामे अंदाजे १४,२१,६०,००० रुपयांच्या निधीतून केले जाणार आहेत. १) गणोरी फाटा ते येसगाव फाटा खुलताबाद रोडपर्यंत रस्ता पुलमोऱ्यासह सुधारणा करणे. (अंदाजित किंमत ८ कोटी ७६ लक्ष रुपये.) २) किनगांव ते किनगांव फाटा पर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉँक्रिटीकरण करणे. (किंमत २ कोटी ८० लक्ष रु.) ३) किनगांव येथील पशुवैद्यकिय रुग्णालयाचे लोकार्पण करण्यात आले. (अंदाजित किंमत १ कोटी २० लक्ष रु.) ४) महिला बालकल्याण जिल्हा परिषद निधीतून २ अंगणवाडी खोल्यांचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत २२ लक्ष ६० हजार रु.) ५) रोजगार हमी योजनेतून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. (अंदाजित किंमत २० लक्ष) ६) जिल्हा परिषद निधी अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. (अंदाजित किंमत ३ लक्ष) सदरील कामांमुळे गावाचे रूप बदलणार आहे. यामुळे साहजिकच नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले. याप्रसंगी मुख्य अभियंता अतुल काका चव्हाण, सौ अनुराधाताई चव्हाण, विजय औताडे, सुहासभाऊ शिरसाठ, जितेंद्रबाबा जैस्वाल, सर्जेराव मेटे, किनगांवच्या सरपंच मनीषाताई चव्हाण, गणोरीच्या सरपंच सरलाताई तांदळे, ऐश्वर्या गाडेकर, नाथअप्पा काकडे, पंडितभाऊ जाधव, बाळु तांदळे, सुचित बोरसे, रवींद्र गायकवाड, कैलास सोनवणे, फारुखभाई शेख, इतर मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.





# नागनाथ घाटुळे यांना सलग दुसऱ्यांदा सर फाऊंडेशन 'नॅशनल टीचर इनोव्हेशन अवॉर्ड'

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** स्टेट इनोव्हेशन ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन (सर फाऊंडेशन) महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात येणारा सर फाऊंडेशन 'नॅशनल टीचर इनोव्हेशन अवॉर्ड २०२३' देशभरातील अनेक प्रयोगशील शिक्षक व क्षेत्रीय अधिकारी यांना वितरीत झाला आहे. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक शिक्षक, क्षेत्रीय अधिकारी, अन्य शिक्षणप्रेमी यांचा समावेश आहे. महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगड, बिहार या आठ राज्यांतील शिक्षकांचा सन्मानार्थींमध्ये समावेश आहे. सर फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य समन्वयक हेमा शिंदे, बाळासाहेब वाघ, सिद्धराम माशाळे यांसोबत भाऊसाहेब चासकर, ह.ना.जगताप यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.करकंब येथील जि प प्राथमिक शाळा लोकरे वस्ती करकंब या शाळेतील उपक्रमशील शिक्षक नागनाथ घाटुळे यांना 'जाणून घेऊ गणिताची भाषा' या नवोपक्रमासाठी हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. लॉकडाऊन काळात शाळा बंद असताना विद्यार्थ्यांवर मूल्यसंस्कार व्हावेत यासाठी त्यांनी या उपक्रम बनवून स्वतःच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले. महाराष्ट्रातील कित्येक शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी यांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला आहे. त्यांना सलग दुसऱ्यांदा हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देण्यात आला आहे. सर फाऊंडेशनने शिक्षण विषयक अनेक महत्वपूर्ण उपक्रम राबविले आहेत. रवि जे मथाई सेंटर फॉर एज्यूकेशनल इनोव्हेशन भारतीय प्रबंध संस्था (आय.आय.एम.) अहमदाबाद, हनी बी नेटवर्क, सृष्टी अहमदाबाद, डाएट व शालेय शिक्षण विभाग यांच्या सोबत विविध उपयुक्त उपक्रम प्राथमिक शिक्षणासाठी राबविले आहेत.

सर फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या 'राष्ट्रीयस्तर शैक्षणिक नवोपक्रम स्पर्धा २०२३' मधून या शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. 'नवोन्मेष' या प्रकल्पांतर्गत हे अवॉर्ड प्रदान करण्यात आले आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगाच्या आधारावर तज्ज्ञ कमिटीमार्फत ही निवड केली जाते.

या पुरस्काराचे वितरण ४ व ५ मार्च २०२३ ला झालेल्या विशेष 'एज्युकेशनल इनोव्हेशन्स कॉन्फरन्स' मध्ये झाले. सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूर याठिकाणी झालेल्या या 'कॉन्फरन्स' मध्ये विविध विषयावर शैक्षणिक मंथन, शिक्षणतज्ज्ञांचे व्याख्यान, परिसंवाद, गटचर्चा, नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगाचे सादरीकरण, पुरस्कार वितरण अशा विविध कार्यक्रमाची मेजवानी सहभागी शिक्षकांना मिळाली.

# अभिनेते भारत गणेशपुरे यांना मातृशोक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** प्रसिद्ध हास्य अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या आई मनोरमाबाई त्र्यंबकराव गणेशपुरे (८३) यांचे येथे गुरूवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर रहाटगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. भारत गणेशपुरे यांचे बंधू मनीष यांच्या रहाटगाव येथील राहत्या घरी मनोरमाबाई यांनी अखेरचा श्वास घेतला. आईच्या निधनाचे वृत्त कळताच भारत गणेशपुरे हे मुंबईहून अमरावतीकडे निघाले आहेत.

# कॉँट्रॅक्टरला धक्काबुक्की

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** आर्थिक व्यवहारातून चिडलेल्या पिता-पुत्रांनी पैसे दिल्याशिवाय जीप जाऊ देणार नाही असे म्हणून शिवीगाळ दमदाटी केली व जीपची चावी काढून घेऊन गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर यास धक्काबुक्की केली. ही घटना मंगळवार ७ मार्च रोजी सकाळी १० च्या सुमारास वाकी- हलदहिवडी ता सांगोला रोडवर घडली. याबाबत, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर धनाजी मारुती घाडगे रा.चिंचोली यांनी पिता-पुत्राविरुद्ध फिर्याद दिली आहे. चिंचोली येथील गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर धनाजी घाडगे हे वाकी येथील बाळासाहेब काटकर यांचेकडून सिमेंट खरेदी करीत असल्यामुळे दोघात आर्थिक व्यवहार होत होते. दरम्यान मंगळवारी धनाजी घाडगे व त्यांचा भाऊ तानाजी घाडगे व त्यांचा ड्रायव्हर सूर्यकांत कांबळे हे विश्वनाथ चव्हाण यांच्या घराजवळ आले असता विशाल काटकर हा त्यांच्या जीप समोर रस्त्यावर आडवा थांबल्याचे पाहून ड्रायव्हर सूर्यकांत कांबळे यांने जीप थांबवली. त्यावेळी विशालने वडीलांना बोलावून जीपची चावी काढून घेतली. फिर्यादी धनाजी घाडगे यास धक्काबुक्की करून माझे पैसे दिल्याशिवाय तुझी जीप जाऊ देणार नाही असे म्हणून शिवीगाळ केली. भाऊ तानाजी घाडगे यांनी पोलीस स्टेशनला येऊन घडला प्रकार सांगितला. पिता-पुत्रांनी मला व चालक सूर्यकांत कांबळे यास जीपमधून खाली उतरून दिले नाही असे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे.



जी आय वन हॉस्पिटलमध्ये महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉस्पिटलमधील सर्व महिला स्टाफला यावेळी गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी हॉस्पिटलचे सर्व संचालक आणि सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# डायलिसिस सेवा तळागाळापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न : डॉ. कराड

## जागतिक मूत्रपिंड दिनानिमित्त फिटनेस फेस्ट : प्रत्यारोपित रुग्ण आणि दात्यांनी साजरा केला वार्षिकोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रत्येक जिल्हा रुग्णालयापर्यंत डायलिसिस सेवा उपलब्ध करून देणे हे आव्हान आहे तथापि केंद्र पातळीवर त्यासाठी प्रयत्न करेन असे आश्वासन केंद्रीय राज्य अर्थमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले.

सुमन किडनी फाऊंडेशन, उत्कर्ष हॉस्पिटल, एमआयटी हॉस्पिटल आणि रिसर्च इन्स्टिट्यूट, जेआयआययू चे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स ॲण्ड रिसर्च आणि निझॉन ट्रेनिंग सिस्टीम यांच्यावतीने जागतिक मूत्रपिंड दिनाच्या निमित्ताने प्रत्यारोपित रुग्ण आणि दाते यांच्यासाठी फिटनेस पेस्टचे आयोजन करण्यात आले होते. बदनापूर वैद्यकीय महाविद्यालयाचे अध्यक्ष मौलाना हुजेफा वस्तान्वी, डीन अझहर अहमद सिध्दीकी प्रमुख पाहुणे तर एमआयटीचे अध्यक्ष मुनिष शर्मा अध्यक्षस्थानी होते. सुमन किडनी फाऊंडेशनचे डॉ. सुहास बावीकर यांनी डॉ . कराड यांचे स्वागत केले तर एमआयटी हॉस्पिटलचे संचालक मुनीश शर्मा यांचे स्वागत डॉ. पूर्वा बावीकर यांनी केले . वैद्यकीय व्यवस्थापक डॉ. संतोष ढाकणे यांची यावेळी उपस्थिती होती. वैधकीय



सेवेचा विस्तार करण्यासाठी अभ्यासक्रमात जागा वाढवण्याबरोबरच आर्थिक तरतूदही केंद्र सरकार वाढवत आहे . त्यामुळे किडनी आणो इतर आजाराच्या रुग्णांना सर्वोत्तम वैद्यकीय सोयी उपलब्ध होतील असा विश्वास डॉ . कराड यांनी यावेळी व्यक्त केला . एमआयटीचे संचालक मुनीश शर्मा यांनी महात्मा फुले योजना किडनीच्या रुग्णांसाठी वरदान ठरत असल्याचे सांगितले. प्रत्यारोपित रुग्ण आणि दात्यांसाठी दरवर्षी साजरा होणारा मूत्रपिंड दिन हा वार्षिक सणासारखाच असतो. मराठवाडा तसेच महाराष्ट्रातून आलेले रुग्ण आणि दाते या वार्षिकोत्सवात सहभागी होऊन किडनी आरोग्याचा संदेश देत असतात.अनुभवाची देवाण घेवाणीतून एकमेकांना दिलासा तर देतात. किडनी विकाराबरोबर जगताना आरोग्य कसे राखायचे यासंदर्भात विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन यावेळी होते. या वार्षिकोत्सवात सहभागी झालेल्या प्रत्यारोपित रुग्ण आणि दात्यांचा सकाळी सहा वाजेपासूनच सगळ्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. मूत्रपिंड प्रत्यारोपणानंतर मागील अनेक वर्षांपासून सर्वसामान्यांप्रमाणे जिवन जगण-यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. त्यांचे अनुभव प्रेरणादायी ठरले. पहिल्यांदाच डायलिसीसवर असलेले रुग्ण सायकल स्पर्धेत सहभागी झाले होते. तीन, पाच आणि दहा किलोमिटर स्पर्धेत उत्साहाने किडनी रुग्णांनी सहभाग नोंदवला. छत्रपती संभाजीनगर सायकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विजय व्यवहारे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. शंभर मिटर स्पर्धेतही अनेकांनी सहभाग नोंदवला. डॉ. गायत्री कुलकर्णी यांनी रुग्णांना शरीर आणि मन शांत ठेवण्यासाठी योगाचे महत्व समजावून सांगितले. मूत्रपिंडरोग तज्ज्ञ डॉ. पुर्वा बाविकर मूत्रपिंड आणि आरोग्य यावर मार्गदर्शन केले .तर गौरव निझौन यांनी फिटनेस आणि खेळ यात समन्वय कसा साधावा याचे सविस्तर मार्गदर्शन केले. अंकिता धाग आरोग्य आणि आहार विषयावर तर डॉ.निखिल खेडकर मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन केले. किडनी आणि ह्रदयरोग टाळण्यासाठी आवश्यक मोफत चाचणीचे आयोजन सकाळी आठ वाजेपासून करण्यात आले होते. अत्याधुनिक मशिनच्यासहाय्याने 150 च्या वर रुग्णांचे बीएमआय, किडनी प्रत्यारोपण झालेल्या रुग्णाच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण, किडनीचे चलनवलन अशा वेगवेगळ्या चाचण्या करुन त्याचा अहवाल संबंधित रुग्णास देण्यात आला.



# बाजार सावंगी येथे महिला दिन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी ( ता: खुलताबाद ) येथे जागतिक महिला दिनानिमित्त तालुका खुलताबाद महसूल प्रशासनाच्या वतीने येथील तलाठी कार्यालयात बुधवार ( ता:८ ) रोजी बाजार सावंगी तलाठी सजातील बाजार सावंगी सह शेखपूर व सोगलगावच्या अनेक शेतकरी व होतकरू महिलांना विनामूल्य 30 महिलांना सातबारा उतारा व 25 महिलांना नमुना नंबर आठ चे दाखले वाटप करण्यात आले या निमित्ताने महिलांमध्ये जनजागृती करण्यात आली.

सजाच्या महिला तलाठी सायली विटेकर उपसरपंच कारभारी नलावडे ग्रामविकास अधिकारी ए बी बनसोड सहाय्यक सुधाकर नलावडे यांचे सह तिन्ही गावातील अनेक शेतकरी महिलांची उपस्थिती होती अशा प्रकारचा उपक्रम जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामीण भागाच्या शेतकरी महिलांसाठी राबवण्यात आला तसेच महिलांचा सत्कारही करण्यात आला.

# महावितरणमध्ये महिला दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या परिमंडल कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाच्या प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक सचिन तालेवार होते. प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिवंसरा व योगतज्ज्ञ डॉ.हर्षदा शेलार प्रमुख अतिथी होत्या. अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे, संजय सरग, प्रवीण दरोली, उपमहाव्यवस्थापक कांचन राजवाडे, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंगल खिवंसरा म्हणाल्या की, अनेक महिलांच्या बलिदानातून महिलांना संरक्षण देणारे कायदे बनले आहेत. हे कायदे का करावे लागले याचा विचार करतानाच त्यांचा दुरुपयोगही व्हायला नको. देशाच्या पहिल्या पाच पंचवार्षिक योजनांत महिलांचा उल्लेखही नव्हता. त्यासाठी




संघर्ष केल्यावर सहाव्या योजनेत समावेश झाला आणि महिलांना सक्षम व सबल करण्याचा विचार पुढे आला. स्त्रीभ्रूणहत्याविरोधी कायद्यानंतरही मुलींचा घटता जन्मदर चिंताजनक आहे. त्यावर सर्वांनी आत्मपरीक्षण करावे. कोणताही अत्याचार सहन करू नका, त्याचा अहिंसक मार्गांनी का होईना, प्रतिकार करा वा निषेध करा. आज महिलांना सामाजिक ताणतणावास सामोरे जावे लागतेय. त्याचा त्यांच्या कामकाजावर व कुटुंबावर परिणाम होत असल्याचे खिवंसरा म्हणाल्या.

डॉ.हर्षदा शेलार यांनी सर्वंच महिलांनी योग्य आहार तसेच नियमित व्यायाम करण्याचा सल्ला दिला. आधुनिकता टाळून पारंपरिक आहार पुरेसा, वेळेवर घ्यावा आणि टीव्ही, मोबाईलचा अतिरेक टाळून वेळेवर झोपणे व वेळेवर उठणे उत्तम आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे, असे त्या म्हणाल्या.अध्यक्षीय समारोप करताना तालेवार म्हणाले की, काळ बदलत असून सर्वच क्षेत्रांत महिला पुरुषांच्या बरोबरीने जबाबदार पदांवर काम करत आहेत. त्या अधिक फोक्स्ड व सक्षम आहेत. महावितरणमध्येही मुख्य अभियंता, कंपनी सचिव ते कार्यकारी संचालक या मोठ्या पदांची जबाबदारी महिला सांभाळत आहेत. पुरुषांनीही महिलांना उद्योजक होण्यासाठी योग्य ते पाठबळ दिले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी मदने-सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रज्ञा दिवेकर व प्राजक्ता पगारे यांनी केले. सुप्रिया देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमास महावितरणच्या महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# न. प.च्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** नगर परिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्रशासक गजानन गुरव व मुख्याधिकारी अरविंद माळी यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेमधील उत्कृष्ट काम करीत असलेल्या 12 महिला सफाई कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह वाटप पंढरपूर अर्बन बँकेच्या संचालिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. संगीता पाटील व डॉ. मैत्रयी केसकर यांच्या शुभहस्ते उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळुजकर, कार्यालय अधीक्षक सुवर्णा डमरे, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, आरोग्य निरीक्षक नागनाथ तोडकर,तनुजा सीतफ यांच्या प्रमुख उपस्थितीत सोना सोलंकी प्रतिभा सोलंकी जमुना सोनवणे,सुवर्णा जाधव,शैला पाटोळे,माया यादव,अरुणा वाघेला,शांताबाई वाघमारे,नंदा चंदनशिवे,विजया,गायकवाड, जया वाघेला,मंगल यादव यांना देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना डॉ संगिता पाटील यांनी सांगितलं की, पंढरपूर शहरांमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी वर्षभर अनेक भाविक मोठ्या प्रमाणात पंढरपूर मध्ये येत असतात सफाई कर्मचारी व इतर




कर्मचारी हे आपले काम प्रामाणिकपणे करत असतात हे काम करत असताना सर्व महिलांनी आपलं आरोग्य चांगले राहण्याच्या दृष्टीने चांगला आहार घेणे आवश्यक आहे. तो आहार पौष्टिक आणि चौरस असला पाहिजे असे सांगून महिलांचे आजार त्यावरील उपाय याबाबतही मार्गदर्शन केले तसेच आदर्श शिक्षिका डॉ मैत्रयी मंदार केसकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की समाजातील महिला ही सक्षम झाली पाहिजे परंतु नुसतं सक्षम न होता आर्थिक दृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज आहे महिलांच्या स्वतःच्या इच्छा आकांक्षा स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे खरंतर महिला या आपल्या कुटुंबाच्या उन्नतीसाठी अतिशय झटत असतात परंतु पुरुष प्रधान संस्कृतीनुसार जो त्यांना मान व न्याय मिळाला पाहिजे तो समाजात मिळत नाही आजही दुय्यम स्थान म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते व चूल आणि मूल या पुरतेच स्त्रीचा कडे बघण्याचा दृष्टिकोन समाजाचा आहे त्यामुळे महिलांनी प्रथम स्वतः मध्ये बदल केला पाहिजे कारण असे म्हटले जाते की ज्याच्या हाती दोरी ती जगास उध्दारी त्यामुळे महिलांनी सक्षम होणे ही काळाची गरज आहे. यावेळी NULM चे संतोष कसबे यांनी सफाई कर्मचारी यांना बचत गटाबाबत माहिती दिली. यावेळी सुवर्णा डमरे व तनुजा सिताफ यांच्या शुभहस्ते डॉ. संगीता पाटील व डॉ.मैत्रयी केसकर यांचा सत्कार करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खरेदी पर्यवेक्षक सचिन मिसाळ, को ऑर्डीनेटर अभिजित घाडगे, कृष्णात जगताप,संतोष कसबे, योगेश काळे व कार्यालयीन कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे स्वागत सुवर्णा डमरे व आभार नागनाथ तोडकर यांनी मानले

# जागतिक महिलादिनी विविध क्षेत्रातील महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक भान जपत आर.पी. आय.गवई गटाचे बुलढाणा जिल्ह्याचे युवा जिल्हा अध्यक्ष प्रशांत तायडे आणि त्यांच्या टिमकडून तालुक्यातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलाचा पुष्पगुच्छ,ट्रॉंफी आणि मिठाई देवून त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान करण्यात आला.

भारतीय संस्कृती ही मातृसत्ताक असून, तिचं मातृत्व, दातृत्व आणि कतृत्व महान आहे. त्या मातृशक्तीचा जागतिक महिला दिनी सत्कार व्हावा या उदात्त हेतूने सामाजिक भान जपत तालुक्यातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान प्रशांत तायडे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून दरवर्षी न चुकता करण्यात येतो. सामाजिक बांधीलकीचा एक भाग म्हणून महिलांचा सन्मान व्हावा या उदात्त हेतूने जागतिक महिला दिनी आरोग्य, महसूल,पोलीस प्रशासन, वन विभाग, पंचायत समिती, तहसील, एकात्मिक बाल विकास, शिक्षण, स्टेट बँक, सेंट्रल बँक, सफाई कामगार, राजकीय अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा प्रत्यक्ष त्यांच्या कार्यालयात जावून सन्मान करण्यात आला.

सुरवातीला पंचायत समितीमधील श्रीमती एन.आर.चतारे, श्रीमती शेळके, श्रीमती शेजोळ ग्रामसेविका, श्रीमती काटकर, सोळंके, भगत प्रतीतमसिंग राजपूत यांचा त्यांच्या कार्यालयात जावून सन्मानचीन्ह, पुष्पगुच्छ व मिठाई देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी मोरे साहेब यांनी सुद्धा यांनी सुद्धा प्रशांत तायडे यांचेकडून दरवर्षी महिलांचा सन्मान केल्या जातो.






# १४ मार्चपासून होणाऱ्या आंदोलनामध्ये सर्व कर्मचारी सहभागी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** सोलापूर जिल्हा नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने लाल बावटा कार्यालय सोलापूर येथे जिल्हाध्यक्ष कॉ. सिद्धाप्पा कलशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे जनरल सेक्रेटरी सुनील वाळूजकर, महादेव आदापुरे, नानासाहेब वाघमारे, शिवाजीराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्ह्यातील 17 नगरपालिका नगरपंचायत मधील कामगार संघटनेची बैठक पार पडली यावेळी बोलताना अँड.सुनिल वाळूजकर यांनी सांगितले की,

महाराष्ट्रातील महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत कर्मचारी व राज्य शासकीय कर्मचारी संघटना यांच्या वतीने जुनी पेन्शन योजना लागू करावी, कंत्राटी हंगामी कर्मचारी यांना सेवेत कायम करावे, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समान कामाला समान वेतन द्यावे व तोपर्यंत किमान वेतन देण्याची कारवाई करावी, सन २०१५ पासून नवीन स्थापन झालेल्या नगरपंचायत मधील उद्घोघोषणे पूर्वीचे व उद्घोघोषणे नंतरचे सर्व कर्मचारी व सफाई कर्मचारी यांचे विनाशर्त विना अट समावेशन करावे नवीन नगरपंचायतीमधील सफाई कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करावा, नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी यांना दहा वीस तीस ची आश्वासित प्रगती योजना लागू करावी व इतर मागण्यासाठी राज्य शासकीय कर्मचारी व महानगरपालिका, नगरपालिका.नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी दिनांक १४ मार्च २०२३ पासून राज्यव्यापी बेमुदत काम बंद आंदोलनाचा करण्यात येत आहे यामध्ये सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील 17 लाख कर्मचारी या संपात सामील होणार आहेत तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व कामगार संघटनेचे पदाधिकारी यांनी हा संपूर्ण यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत व नगरपालिके नगरपंचायत मधील सर्व कर्मचारी संपात सहभागी होतील या दृष्टीने प्रयत्न करावेत शासनाने वेळीच मागण्या मान्य केल्यास वेळ पडल्यास अत्यावश्यक सेवा सुद्धा बंद करण्याचा निर्णय घेण्यात येईल असे सांगितले यावेळी कॉम्रेड सिद्धाप्पा कलशेट्टी शिवाजीराव पाटील महादेव आदापुरे नानासाहेब वाघमारे धनराज कांबळे सुनील मदने योगेश घंटे यांनी मनोगत व्यक्त केले व सोलापूर जिल्ह्यातल्या सर्व नगरपालिका या संपात सहभागी होतील असे आश्वासन यावेळी दिले या सभेस सोलापूर जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी बाबासाहेब पवार, नूरउद्दीन खलिफा, अविनाश शिंदे, योगेश घंटे, दादासाहेब बडवे, भिमभगवान किरगल, बाळासाहेब पायगन, किरण वाघमारे, दत्ता कुर्डे व इतर प्रतिनिधी हे उपस्थित होते.

# तोरणाळा ग्रामपंचायतने पाणीपुरवठा पाईपलाईनची केली दुरुस्ती

## दैनिक आधुनिक केसरीची घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील तोरणाळा येथे गावाबाहेर आरोग्य उपकेंद्र जवळ रस्त्याला लागूनच गावाला पाणीपुरवठा करणारी मेन पाईपलाईन एक ते दीड महिन्यांपासून फुटलेली होती त्यामुळे तोरणाळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात सापडले होते. पाईपलाईनकडे ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत असल्याने दि-06 रोजी "तोरणाळा ग्रामपंचायत च्या दुर्लक्षाधीन वृत्तीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात"अशी बातमी "दैनिक आधुनिक केसरी" ने प्रसिद्धी केली होती.सदर बातमीची दखल घेऊन तोरणाळा ग्रामपंचायत सरपंच युवराज पाटील यांनी तातडीने दखल घेऊन ते काम तात्काळ जे.सी.बी.च्या सहाय्याने पाणीपुरवठा मेन पाईपलाईन दुरुस्ती करून गावाला सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्यात आला.तोरणाळा ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी "दैनिक आधुनिक केसरी"संपादकांचे आभार व्यक्त केले.





# पोलीस आयुक्तालयात जागतिक महिला दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांच्या संकल्पनेतून पोलीस मुख्यालयात जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले. पोलीस विभागात काम करणाऱ्या महिलांच्या गौरवार्थ हा कार्यक्रम घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास मानसोपचार तज्ञ् डॉ. जितेंद्र डोंगरे, जेष्ठ पत्रकार व विशाखा समिती सदस्य मंगल खिवंसरा, पोलीस उपायुक्त अपर्णा गीते यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. डोंगरे यांनी महिलांसाठी तणाव व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले घर आणि नौकरी सांभाळून आनंदी राहण्याचे सूत्रबद्ध विवेचन केले . तर डॉ. गुप्ता म्हणाले की, जागतिक महिला दिनीच महिलांचा सन्मान व्हावा असे नाही तर महिलांना नेहमीच सन्मानाने वागणूक द्यायला हवी. त्याच प्रमाणे मंगल खिवंसरा यांनी महिला सबली करणा बाबत आपले विचार मांडले. त्यानंतर आपले विचार व्यक्त करतांना उपायुक्त गीते म्हणाल्या की, समाजातील स्त्री पुरुष भेदभाव थांबला पाहिजे. प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांसोबत यशस्वीपणे जबाबदारी सांभाळतात हे दाखवले पाहिजे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता पोलिस निरीक्षक आम्रपाली तायडे, अपर्णा यादव , प्रशांत सुगरवार यांनी नियोजन केले होते, अशी माहिती पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांनी दिली.

# सोनचिरैया उपजीविका केंद्रच्या माध्यमातून महिलांना सक्षम करणार : शिल्पाताई परदेशी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर परिषद अंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभाग मार्फत दिनांक नऊ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महिला बचत गटासाठी सोनचीरैया उपजीविका केंद्र वैजापूर नगर परिषद वैजापू चे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्थानी सौ शिल्पाताई दिनेश परदेशी व उद्घाटक उपाध्यक्ष साबेर खान अमजेद खान हे होते.

शहरी गरीब उत्पादक व ग्राहक यांची सांगड घालणे व शहरी गरिबांना माहिती आणि व्यवसायासाठी आवश्यक ते साह्य करणे हा शहर उपजीविका केंद्राचा मुख्य उद्देश आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वैजापूर शहरातील सर्व महिलांची आरोग्य तपासणी ,रक्त तपासणी करण्यात आली. या दिनानिमित्त नगर परिषद वैजापूर राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान योजनांची व बचत गटांच्या उत्पादित वस्तू व मालाचे प्रदर्शन भरवण्यात आले.

याप्रसंगी मुख्याधिकारी भागवत बिघोत नगर परिषद वैजापूर यांनी सर्व महिला बचत गटातील सदस्यांना जागतिक महिला दिनानिम्मित मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



यावेळी नगरसेवक चव्हाण प्रकाश , बनकर दशरथ ,राजपूत राजूसिंग, जेजुरकर स्वप्नील , सखाहरी बर्डे , चव्हाण शैलेश मुकिंदराव , शेख रियाज अकिल, खैरे गणेश रघुनाथ , शेख इमरान रशीद , वाणी सचिन ( बंडू ) ,भाटीया निलेश, सौ शेख मुमताजबी , सौ भोपळे प्रिती, व्यवहारे सुप्रिया, घाटे द्वारकाबाई , त्रिभुवन नंदाबाई, राजपूत जयश्री दिनेश, तांबे अनिता सुरेश, भुजबळ शोभा विलास, टेके ज्योती ज्ञानेश्वर, बनकर माधुरी दशरथ, गायकवाड संगीता राजेश, मगर लताबाई अंकुश सह सर्व सदस्य यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच कार्यक्रमाला उपस्थित उपमुख्याधिकारी राहुल साठे व स्थापत्य अभियंता प्रकाश पाटील नगर परिषद वैजापूर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धोंडीराम सिंह ठाकूर यांनी केले. समुदाय संघटक दिवाकर त्रिभुवन, चित्रा थोरात, जयश्री दिलीप सोनवणे, ललिता विजय देशमुख, सूर्यकांता काकडे, रोहिणी योगेश नाईकवाडी, सायली निबाळकर, सोनाली, रीस्वाल शहर उपजीविका केंदाच्या सर्व प्रतिनिधी यांनी कार्याक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स.प्रकल्प अधिकारी सुनिल भाग्यवंत यांनी केले.



# होळीच्या निमित्ताने गीत - संगीताच्या तालावर थिरकले ज्येष्ठ नागरिक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** गुलालासोबत कोरड्या रंगांची मुक्तपणे उधळण करत तसेच गीत - संगीताच्या तालावर उत्साहाने नृत्य करत पिंपळे सौदागरमधील साईपर्ल सोसायटीतील ज्येष्ठ नागरिकांनी रंगपंचमी साजरी केली. प्रारंभी सोसायटीच्या प्रांगणात एकत्र येऊन सर्वांनी होलिकोत्सवानिमित्त एकमेकांना शुभेच्छा देऊन गुलालाची उधळण केली. साऊंड सिस्टिमवर गाणे लावून ' रंग बरसे भिगे चुनरिया रंग बरसे ', ' होली खेले रघुवीरा..', ' खेळताना रंग बाई होळीचा , झिंग झिंग झिंग आठ, नाटो नाटो या आणि इतर गाण्यांवर मनसोक्त नाच करत ज्येष्ठ नागरिकांनी रंगपंचमीचा आनंद लुटला. श्रीकांत माने यांच्या आयोजनाखाली झालेल्या या रंगारंग कार्यक्रमात दिपू शेठ, मेघानी, आठवले, निकेश कुमार, राऊत, नांदगावकर ,फुलवाले, नंदनवार, अरविंद माने ,गुप्ता, बोमीडवार, देशमुख, कांबळे, राणे, सुमय्या, न्यायाधीश, चौधरी, काटे, दासानी, अगरवाल, शहा, त्रिवेदी, सिंग, भाले, गुप्ता, जाधव, बजाज, काटकर आदींनी सहभाग नोंदविला.

# नाथषष्ठी यात्रा काळात वारकरी भाविकांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषद सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** संत एकनाथ महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्ताने राज्यातील लाखो वारकरी भाविक पैठणला तीन दिवशी मुक्कामी येत असतात. यानिमित्ताने शासनाच्या माध्यमातून नगर परिषद पैठण वारकर्यांनसाठी दर वर्षी या सुविधा पुरवते. गावातील नाथमंदीर , बाहेरील नाथमंदीर व यात्रा कॅम्पवरील न.प.च्या कार्यालयास मंडप पुरवठा, लाऊडस्पिकर, स्टेज, सतरंजी, खुर्ची, टेबल , मॅट , जनरेटर व आवश्यक त्याठिकाणी लाईटची व्यवस्था करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. मंदीर प्रवेशव्दार व इतर पाच ठिकाणी बॉक्स कमानी उभारणे, स्मरणीका व दुरध्वनी पुस्तीका छपाई करुन वारकऱ्यांना देणे, स्वच्छता विभागास लागणारे साहित्य पुरवठा करणे खराटे, लोखंडी व प्लास्टिक टोपले , फावडे , टिकाव व सुरक्षा विषयक साहित्य हॅन्डग्लोज , जाकिट , हेल्मेट सब्बल व गमबुट वाळवंट व पालखी रस्त्यावर प्रत्येक पोलवर एल.ई.डी. लाईट फोकस सह 10 ठिकाणी तात्पुरते हायमास्ट उभारणे ,1000 शौच खड्डे करणे व स्वच्छतेची व्यवस्थाकरणे, फिनेल पुरवठा करणे ( उच्च दर्जाचे व आय.एस.ओ. प्रमाणित असावे ) गॅमेझिंग पावडर व कार्बोरिक पावडर पुरवठा करणे ( उच्च दर्जाचे व आय.एस.ओ. प्रमाणित असावे ).

अधिकारी, कर्मचारी व सेवेकरी यांच्या करीता जेवण पुरवठा करणे ( ताटामध्ये या पदार्थाचा जेवणाचा समावेश असवा. पोळी, भात, वरण, दोन भाज्या ई. ) यात्रा कॅम्पवर चहा, नाश्ता पुरवठा करणे. यात्रे निमित्त संपुर्ण शहरात जंतुनाशक व रोग प्रतिबंधक फवारणी करणे. काल्याचे थेट प्रेक्षपण करण्यासाठी स्क्रीन 8 x 12 फुट फुल एचडी स्क्रीन( 6 ) ठिकाणी लावणे,भाविकांना आवाहन करण्यासाठी फलक फ्रेमसह पुरवठा करणे व उभारणी करुन देणे, जायकवाडी येथील प्युअर वॉटर व रॉ वॉटर पंपहाऊस दुरुस्ती करणे, 40 ठिकाणी सि.सि.टी.व्ही . कॅमेरे बसविणे सर्व कॅमेरे क्षमता उच्च दर्जाचे असावेत . तसेच मॉनिटरींग स्क्रीन 42 इंच किंवा त्यापेक्षा मोठया आकाराची असावी व त्याचे प्रक्षेपण न.प.च्या नियत्रंक कक्षात असावे व डाटा सेव्ह करणे, आवश्यक त्या ठिकाणी रंगरंगोटी करणे, ॲलम ,ब्लिचींग पावडर पुरवठा करणे ,5000 लिटरचे पिण्याचे पाणी टँकर भाडेतत्वावर पुरवठा , फोटो व व्हीडीओग्राफी 02 ड्रोन कॅमेरासह ( तीन दिवसा करीता ) करणे यात्रा कालावधीतील तीन दिवसाचा फोटाचा एक उच्च प्रतिचा अल्बम तयार करुन देणे व व्हिडीओग्राफीची



डी.व्ही.डी करुन देणे, विद्युत व्यवस्था करण्यासाठी विद्युत साहित्य पुरवठा करणे, यात्रा मैदान , पालखी रस्ता व पैठण शहरातील इतर रस्ते इ . ठिकाणी 06 एम . एम . | खडी पुरवठा करणे व पसरविणे , लेव्हलिंग ट्रॅक्टर पुरवठा करणे . डिझेल व ऑपरेटर इत्यादीसह पुरवठा करणे व आवश्यक त्या ठिकाणी कामे करणे . यात्रा मैदान , पालखी रस्ता व पैठण शहरातील इतर रस्ते इ . ठिकाणी मुरुम पुरवठा करणे व परसविणे ,

यात्रा काळात स्वच्छतेसाठी व इतर अनुषंगीक कामासाठी मजुर पुरवठा करणे ,

यात्रा करीता 300 फिरते शोचालय पुरवठा करणे , Sludge Machine ची व्यवस्था करणे . वाहनांची वाहतुक करणे , पाण्याची व्यवस्था करणे व सदरील ठिकाणी आपले कर्मचारी उपलब्ध करुन देणे इत्यादी पुर्ण व्यवस्था करणे, गोदावरी पात्रातील ( वाळवंट ) चिंध्या उचलणे व शेवाळ काढणे जल ड्रोप ( क्लोरीन ड्रोप ) पुरवठा करणे , यात्रे मध्ये जेवणाच्या पत्रावळी उचलण्यासाठी गारबेज बॅग पुरवठा करणे ( 50 मायक्रॉन च्या वर आसाव्यात व MPCB कडुन प्रमाणित व नोंदणीकृत असाव्यात ) पब्लिक अनाऊन्समेंट व्यवस्था करणे . ( 40 भोंगे सर्व सुविधेसह ) स्वच्छतेच्या कामासाठी 2 ट्रॅक्टर व ऑपरेटर सह व डिझेल सह पुरवठा करणे ,यात्रा निमित्ताने भाडे तत्वावर वॉकी टॉकीचे 12 संच सेल सह पुरवठा करणे ,ढापे तयार करणे ,मोक्षघाट फरशी पुरवठा करणे ( फिटींग सह ) , पाणी पुरवठा वितरण नलिका लिकेज दुरुस्ती करणे , यात्रा काळात मोक्ष घाटावर मॅटींग टाकणे,यात्रा काळात सॅनिटायजर खरेदी करणे यात्रा काळात मास्क खरेदी करणे यात्रा काळात शहरातील मुख्य नाले सुफाई करणे 1 ) कहारवाडा येथील मुख्य नाला 2 ) बस स्टॅन्ड मागील बाजु ( तहसिल रोड ) ते डॉ . आंबेडकर पुतळा त 3 ) सराफनगर व शशी विहार येथील मुख्य नाला नविन कावसान येथील मुख्य नाला 4 ) 5 ) धनगरवाडा सार्वजनिक शौचालय ते गोपाल नगर ते सिध्देश्वर रोड पर्यंत 6 ) कन्या शाळा , लहुजी नगर ते गागाभट्ट चौक ते गोदावरी पात्रा पर्यंत 7 ) ग्रिन चौक ते मौलाना साहब दर्गा पर्यंत 8 ) पंचायत समिती मागील नाला ते वखार महामंडळ ते उद्यान रोड पर्यंत, बायोकल्चर पुरवठा करणे, स्मृती चिन्ह पुरवठा करणे.

ईत्यादी सुविधा नगर परिषद कडुन नाथषष्टी यात्रा काळात लाखोंच्या संख्येने येत आसलेल्या वारकरी व भाविकांना सोई सुविधा देण्यासाठी नगरपरिषदे पैठण सज्ज झाली असुन यात्रा काळात या सोई सुविधा कटाक्षाने वारकऱ्यांना मिळाव्या अशा कडक सुचना संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नाथषष्टी नियोजन बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे यानी केल्या परंतु या पैकी किती सुविधा वारकऱ्यांनसाठी पुरवल्या जातात का हा प्रश्न पैठणकराना पडलाय.

## संजय गांधी योजनेचे तीन कोटी 75 हजार तहसीलला प्राप्त आ. लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** संजय गांधी योजनेच्या 7739 लाभार्थ्यांपैकी 4705 लाभार्थ्यांचे. गेली सहा महिन्यापासून. एप्रिल मे जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर. या महिन्याचे तसेच प्रत्येकी तीनशे रुपये व अनुसूचित जाती च्या 46 लाभार्थ्यांचे प्रत्येकी पाच महिन्याचे पाच हजार रुपये असे एकूण रखडलेले एक कोटी रुपये मिळाले असून. येत्या दोन दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येतील अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.

आमदार बबनराव लोणीकर यांनी काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की, परतुर तालुक्यात श्रावण बाळ योजना अ. लाभार्थी 2881. श्रावण बाळ " 3034. विधवा 232. अपंग 133. संजय गांधी निराधार लाभार्थी. 1449. तर अनुसूचित जाती लाभार्थी. 46 आहेत. श्रावण बाळ योजना ब च्या लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन महिन्याचे दोन हजार रुपये वर्ग करण्यात आले आहेत. राहिलेल्या उर्वरित लाभार्थ्यांचे धनादेश तयार असून येत्या दोन दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग होतील. गेल्यात काही दिवसांपासून हे मानधन रखडले होते या संदर्भामध्ये आपण पाठपुरावा करून लाभार्थ्यांचे मानधन लवकर कसे प्राप्त होईल यासाठी प्रयत्न केले होते परिणामी लाभार्थ्यांचे मानधन जमा झाले असून योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात आमदार लोणीकर यांनी म्हटले आहे. मानधन जमा झाल्यामुळे लाभार्थ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## प्रा. चिराग सेनमा यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** डॉक्टर घडविणारी फॅक्टरी, महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा यांचा वाढदिवस गुरुवार, दि. ९ मार्च रोजी विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी आयआयबीच्या नूतन इमारतीत आयोजित रक्तदान शिबीरात आयआयबी इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी अशा जवळपास ५० दात्यांनी रक्तदान केले, याशिवाय आयआयबीच्या विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी तपासणी करण्यात आली. आतापर्यंत हजारो डॉक्टर घडविण्यात आपली महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा यांचा वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षी विविध नाविन्यपूर्ण आणि सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येतो. अन्नदान, रक्तदान, मोफत आरोग्य तपासणी असे महत्त्वाचे उपक्रम ९ मार्च रोजी राबविण्यात येतात. दरम्यान, उन्हाळ्यात सर्वत्र रक्ताचा तुटवडा निर्माण होत असतो ही बाब लक्षात घेता गतवर्षीप्रमाणे यंदाही प्रा. चिराग सेनमा यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. आयआयबीच्या नूतन इमारतीत आयोजित रक्तदान शिबीरात आयआयबी इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी अशा जवळपास ५० दात्यांनी रक्तदान केले.



विशेष म्हणजे आपल्या वाढदिवसानिमित्त स्वतः प्रा. चिराग सरांनी रक्तदान केले. त्याचबरोबर आयआयबी इन्स्टिट्यूट मध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसह ८ वी, ९ वी , १० वीचे फाउंडेशनमध्ये शिकत असलेल्या शेकडी विद्यार्थ्यांची सुद्धा मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. दरम्यान, प्रा. चिराग सरांच्या वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच आयआयबी इन्स्टिट्यूटमध्ये शिकत असलेले विद्यार्थी, आयआयबीमध्ये कार्यरत असलेले प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह शहरातील अनेक मान्यवर, पत्रकार बांधव , विविध सामाजिक संघटनाचे प्रमुख , वसतिगृहचालक, पालक आणि विद्यार्थ्यांनी प्रा. चिराग सरांना शुभेच्छा दिल्या. सायंकाळी आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात अनेक मान्यवरांनी प्रा. चिराग सरांना शुभेच्छा देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in